# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २३, १९३९ (शके)**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) पर्यावरण मंत्री**
**(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९४**

---

## मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत

**(१) * ३४९९८ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३१४०३ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुस्लिम समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या अध्यादेशाव्दारे राज्यातील मुस्लिम समाजाला शासकीय सेवा, शैक्षणिक सोयी सुविधा इत्यादी मध्ये ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने अंतरीम आदेशाव्दारे मुस्लिम समाजासाठी खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील प्रवेश व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुस्लिम समाजासाठी नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ९ जुलै, २०१४ रोजीच्या अध्यादेशाद्वारे मुस्लिम समाजासाठी नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी ५% आरक्षण देण्यात आले होते.

याबाबत मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी अंतरिम निर्णय दिला आहे व सदर अंतरिम आदेशाव्दारे शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आले आहे. परंतु खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील प्रवेश व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे. सदर अध्यादेशाचे दिनांक २३ डिसेंबर, २०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने सदर अध्यादेश व्यपगत झाला आहे.

सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात अंतिम निर्णयासाठी प्रलंबित आहे. याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानास पात्र म्हणून शासन आदेश निर्गमित केलेल्या शाळांच्या अनुदानाबाबत

**(२) * ३५८५१ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.अपूर्व हिरे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेच्या सुमारे २ हजार विनाअनुदानित शाळा असून राज्यातील कायम विनाअनुदानावरून अनुदानास पात्र शाळांना शासन निर्णय दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ अन्वये सरसकट २० % अनुदान वितरीत करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच अनुदानास पात्र ठरलेल्या दिनांक १ व २ जुलै, २०१६ रोजीच्या शासन आदेशातील शाळा व वर्ग तुकड्या व अनुदानास पात्र शाळांची यादी घोषित करुन अनुदान देण्याचा निर्णय होऊन सुध्दा निधी उपलब्ध करुन दिला जात नाही तसेच अघोषित शाळांना लवकरच निधी सहीत घोषित करण्याबाबत मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी आश्वासन दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानाअभावी मागील १७ वर्षापासून या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तुटपुंज्या वेतनावर काम करीत असून शासनाच्या या वेळकाढू धोरणाचा निषेध करण्यासाठी या विनाअनुदानित शाळांमधील हजारो शिक्षकांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी अनवाणी विद्यादानाचे काम केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील मुल्यांकन झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयांचे अनुदान वितरीत करण्याबाबत शासनस्तरावर सुरु असलेली सकारात्मक कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील गेली १६ ते १७ वर्षापासून अनुदानाच्या प्रतिक्षेत असलेल्या सर्वच विनाअनुदान तत्वावरील शाळांना अनुदानाच्या जाचक अटी-शर्ती शिथील करून सरसकट २० % अनुदान मंजुर करण्यात यावी, अशी आग्रही मागणी संबंधित शाळा, व्यवस्थापन, शिक्षक व विनाअनुदानित संघटनांकडून सातत्याने करण्यात येत असल्याच्या पार्श्वभुमीवर शिक्षक संघटनाकडून आंदोलने व मोर्चे करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पात्र झालेल्या शाळा व वर्ग तुकड्या आणि पात्र होण्याच्या प्रतिक्षेत असलेल्या शाळा व वर्ग तुकड्या यांना अनुदानास पात्र म्हणून घोषित करून अनुदान देणेबाबत तसेच शासन आदेशाप्रमाणे २०% अनुदान वितरीत केलेल्या शाळांना पुढील टप्पा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) दिनांक १ व २ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये अनुदानास पात्र घोषित केलेल्या शाळांना अनुदान मंजूर करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४) याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(५) आंदोलने व मोर्चे काढण्यात आले. शैक्षणिक गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने आवश्यक अटी व शर्ती विहित करण्यात आलेल्या आहेत. त्या जाचक नाहीत.

(६) याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधी खाते पूर्ववत सुरू करण्याबाबत

**(३) * ३५४७३ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अंशतः अनुदानित शाळेतील नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी खाते काढण्यात आले होते, परंतु ते खाते आर्थिक वर्ष २०११-१२ पासून शासनाने बंद केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याविरूध्द राज्यातील सुमारे ८०० शिक्षक/कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ व नागपूर खंडपीठ या ठिकाणी याचिका दाखल केल्या त्या याचिकांवर मा.उच्च न्यायालयाने निर्णय देऊन शासनाच्या आदेशाला स्थगनादेश दिल्याने प्रथम २२८ शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधी खाते पूर्ववत सुरू करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित ६६२ शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या प्रकरणीसुध्दा मा.उच्च न्यायालयाने निर्णय देऊन शासनाच्या आदेशास स्थगनादेश दिला, परंतु शासनाने या न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी अद्यापपर्यंत केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१७ तसेच दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन पाठवून या ६६२ शिक्षकांच्या प्रकरणी न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी त्वरीत करण्यात यावी अशी विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेचा लाभ उर्वरित कर्मचाऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) होय.

(५) शिक्षण संचालनालयाने क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक/ शिक्षकेतरांना सावित्रीबाई फुले-फातिमा शेख आरोग्य कुटुंब योजना लागू करण्याबाबत

**(४) * ३५२४० श्री.कपिल पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३२२७० ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षकांना त्यांच्या ज्ञानदानाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ नये यासाठी शासनाकडून विविध योजना सुरु केल्या असून शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षक व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्यासाठी होणारा खर्च भागविण्यासाठी मेडिकल योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मेडिकल योजनेस जास्त वेळ लागत असून ही योजना खर्चिक असल्याने सदर योजना बंद करुन कॅशलेस मेडिकल योजना सुरु करण्यासाठी शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजनेत जिल्हानिहाय रूग्णालये व सेवा उपलब्ध असून या योजनेखाली अधिक चांगल्या प्रकारे आरोग्य सुविधा कमी खर्चात उपलब्ध असल्याने एकाच प्रकारच्या योजनेवरील खर्चाची व्दिरुक्ती टाळणे, विमा अभिकर्ता नेमण्यासाठी कमिशनवर होणारा अनावश्यक खर्च टाळणे व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटूंबियांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातुन शिक्षण विभागासाठी देखील शासन कामगार विभागाच्या धर्तीवरच महात्मा ज्योतीबा फुले जीवनदायी योजनेत समाविष्ट करून आणणेबाबत लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री यांना लेखी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेप्रमाणे राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस कार्डाची सावित्रीबाई फुले-फातिमा शेख आरोग्य कुटुंब योजना मार्च पूर्वी लागू करण्याची मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी नागपूर अधिवेशनात घोषणा करुनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त योजनेची अंमलबजावणी कधी होणार, त्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे तसेच सदर योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.
(३) होय.

(४) व (५) नाही. तथापि, राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याची घोषणा मा.शालेय शिक्षणमंत्री यांनी केली होती. सदर योजना लागू करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

-----------------

## अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत कार्यरत विशेष शिक्षक व परिचरांचे वेतन अदा करण्याबाबत

**(५) * ३५१९८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत कार्यरत ११८५ विशेष शिक्षक व ७२ परिचरांच्या दिनांक ७ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयानुसार समाप्त करण्यात आलेल्या सेवा शासनाने दिनांक ५ जानेवारी, २०१७ च्या आदेशानुसार व शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांच्या दिनांक २१ जानेवारी, २०१७ च्या पत्रानुसार पुन्हा पुर्नःप्रस्तापित केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष शिक्षक व परिचरांचे नियुक्तीपासुनचे ४ ते ५ वर्षापासूनचे थकीत व नियमित वेतन अदा करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी संघटनेच्यावतीने तसेच नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास अनेक वेळा निवेदन पाठवून सर्व विशेष शिक्षक व परिचरांना राज्य शासनाच्या सेवेत कायम करून थकीत व नियमित वेतन अदा करण्याबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ पासून संविधान चौक, नागपूर येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विशेष शिक्षक व परिचर यांच्या मागण्यांवर निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) दिनांक ०८/११/२०१७ च्या शासन निर्णयान्वये केंद्र शासनाने पात्र ठरविलेल्या ८४० विशेष शिक्षकांचे थकीत वेतन अदा करण्यात आले आहे.

-----------------

## येवला (जि.नाशिक) तालुक्यात नवीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(६) * ३४८४० श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ३१८०२ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील राजापूरसह ४१ टंचाईग्रस्त गावांसाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधून नवीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ च्या पत्रान्व्ये शासनास पूर्वव्यवहार्यता अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वव्यवहार्यता अहवालाच्या अनुषंगाने सदर प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेस मंजुरी देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येवला तालुक्यातील राजापूरसह ४१ टंचाईग्रस्त गावांसाठी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेस मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रस्तावित मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम टप्पा-०२ अंतर्गत सदर ४१ टंचाईग्रस्त गावांसाठी नवीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तयार करण्यासाठी प्राप्त झालेल्या पूर्वव्यवहार्यता अहवालाची छाननी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एक भाषिक पुस्तक योजनेत अनियमितता झाल्याबाबत

**(७) * ३४९७४ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील वर्षीच्या द्विभाषिक पुस्तक योजनेनंतर राज्याच्या शिक्षण विभागाने यावर्षी एक भाषिक पुस्तकाची योजना आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या निविदेच्या नियमांची पूर्तता न करणाऱ्या काही प्रकाशकांचा यात समावेश करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकाशक संघ आणि प्रकाशन परिषद या दोन्ही संघटनांनी योजनेची नियमावली डावलून आणि अर्धवट कागदपत्रे देऊन निविदा प्राप्त झालेल्या प्रकाशकांविरुध्द तसेच शिक्षण विभागाच्या नियमबाह्य कारभाराविरोधात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) व (५) पुढील चौकशी सुरु आहे.

-----------------

## पुणे शहरातील खाजगी क्लासेसकडून विद्यार्थ्यांची होणारी आर्थिक फसवणूक रोखण्याबाबत

**(८) * ३५२६७ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात अभियांत्रिकी, वैद्यकीय, पदवी व इतर व्यावसायिक शिक्षणासाठी खाजगी क्लासेसकडून मोठया प्रमाणात शिक्षण शुल्क घेऊन विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पुणे शहरातील विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक रोखण्याबाबत कार्यवाही करुन खाजगी क्लाससेवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) या संदर्भातील तक्रार आढळून आली नाही.

(२) राज्यातील खाजगी शिकवणी वर्गांवर नियंत्रणाकरीता अधिनियम तयार करण्याच्या अनुषंगाने विधेयकाचा मसूदा तयार करण्यासाठी दिनांक ०४/०१/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई, ठाणे व पुणे जिल्ह्यातील वितरण संचात फेरफार करणाऱ्या पेट्रोल वितरण पंपचालकांवर कारवाई करण्याबाबत

**(९) * ३४७८५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे व पुणे या जिल्ह्यातील पेट्रोल वितरण पंपावर वितरण संचात (डिस्पेन्सिंग युनिट) तसेच इलेक्ट्रॉनिक चीपच्या सहाय्याने फेरफार करुन ग्राहकांना त्यांनी मोजलेल्या किंमतीपेक्षा कमी इंधन देऊन त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी माहे जून ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वैधमापन शास्त्र विभागाने काही पेट्रोल पंप चालकांविरुध्द कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पेट्रोल डिझेलच्या वितरण पंपावरील चोरीस प्रतिबंध घालण्यासाठी माहे ऑक्टोबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात आखण्यात आलेल्या उपाययोजनांवर काही पेट्रोल कंपन्यानी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागील ६ महिन्यांच्या कालावधीत किती इंधन चोरीच्या घटना निदर्शनास आल्या व कोणत्या कंपन्यांनी त्याबाबत विरोध दर्शविला, तसेच इंधन चोरी करणाऱ्या पेट्रोल पंप व्यावसायिकांवर कारवाई करुन त्यांचे परवाने रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांच्या गुन्हा शाखेने कळविल्यानुसार राज्यातील विविध ठिकाणी पेट्रोल व डिझेल पंप तपासणीकामी वैधमापन शास्त्र यंत्रणेतील क्षेत्रिय अधिकारी त्यांना उपलब्ध करुन देण्यात आले असून त्यानुसार पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्या गुन्हा शाखेसोबत त्यांच्या नेतृत्वाखाली तपासणी केली आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

काही तेल उत्पादक कंपन्यांनी विरोध दर्शविला होता.

वैधमापन शास्त्र यंत्रणेने ऑक्टोबर, २०१७ अखेर १०५३ इतक्या पेट्रोल पंप आस्थापनांची तपासणी करुन देय मापापेक्षा कमी पेट्रोल/डिझेल देणे, विहित मुदतीत फेरपडताळणी व मुद्रांकन करुन न घेणे व आवेष्टित वस्तु विषयक तरतुदींचे उल्लंघन करणे याबाबत १०१ प्रकरणे नोंदविण्यात आलेली आहे.

पेट्रोल पंप व्यावसायिकांची परवाने रद्द करण्याचे अधिकार वैधमापन शास्त्र यंत्रणेकडे नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत

**(१०) * ३५०६१ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३०१९४ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना दिनांक १ जानेवारी, २००६ पासून रुपये ४३,०००/- ची सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत व त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार किमान वेतन रू. ४३,०००/- करण्याबाबत शासनस्तरावर विचारविनिमय सुरू आहे. त्यानुसार प्राचार्य पदांसाठीच्या पूर्वीच्या व सुधारित अनुभवाच्या अटींच्या मुद्यांवर विद्यापीठ अनुदान आयोगाचे अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून त्यांच्या दिनांक २०/१०/२०१७ च्या पत्रान्वये अभिप्राय प्राप्त झाले असून त्यास अनुसरून प्राचार्यांना रुपये ४३,०००/- किमान वेतन लागू करण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

दिनांक १२ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील आदिवासी, डोंगराळ व ग्रामिण भागातील अकृषि विद्यापीठे, संलग्नित शासकीय संस्था / महाविद्यालये, अशासकीय अनुदानित महाविद्यालये तसेच पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था इ. मधील प्राचार्यांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वरून सरसकट ६५ वर्षे करण्यात आलेले आहे. उर्वरित क्षेत्रातील प्राचार्यांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत ६० वरून ६५ वर्षे वाढ करण्याबाबत दिनांक ५ मार्च, २०११, दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ व दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२ च्या शासन निर्णयातील तरतुदी कायम ठेवण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अभियांत्रिकी महाविद्‌यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) * ३५३७७ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित : दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक २८८९९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अभियांत्रिकी महाविद्‌यालय, औरंगाबाद येथील प्राध्यापकांच्या मंजूर असलेल्या १३९ पदांपैकी ६१ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अभियांत्रिकी महाविद्‌यालयाची मुख्य इमारत व कार्यशाळा इमारतीचे छत खराब झाले असल्याने पावसाळयात सदर छत गळत असून सदर संस्थेत २००० विद्‌यार्थी शिक्षण घेत असल्याने विद्‌यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी इमारतींची दुरुस्ती करण्यासाठी रुपये १ कोटी ४० लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्‌यालयातील रिक्त पदे भरुन इमारत दुरुस्तीसाठी निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) राज्यातील स्वायत्त व अस्वायत्त अभियांत्रिकी महाविद्‌यालयातील शिक्षकीय पदांच्या बिंदूनामावल्या प्रमाणित करुन घेण्याची कार्यवाही सुरु असून तद्‌नंतर रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्रे सादर करण्यात येतील.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद या संस्थेच्या छत दुरुस्तीच्या बांधकामासाठी रुपये १४७.३९ लक्ष रकमेचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश दिनांक ०३/०१/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. या कामासाठी विधीमंडळाच्या चालू अधिवेशनात पूरक मागणीद्वारे तरतूद उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) येथे म.औ.वि.महामंडळातील रासायनिक कारखान्यातून प्रदुषण होत असल्याबाबत

**(१२) * ३५५९२ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३२४५० ला दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील रासायनिक कारखान्यातून केमिकलयुक्त सांडपाणी नदीत सोडले जात असून माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पडलेल्या मुसळधार पावसात धाटाव येथील रासायनिक कंपनीतून केमिकलयुक्त पाणी कुंडलिका नदीच्या पात्रात तसेच धुक्याच्या वेळी हवेत प्रदुषित वायू सोडण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कारखान्यातून सोडण्यात आलेले केमिकलयुक्त सांडपाणी शेतात शिरल्याने शेतीचे नुकसान होवून नागरिकांना त्वचेच्या आजाराला सामोरे जावे लागत असून कुंडलिका नदीतील मासेही मरण पावल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रासायनिक कारखान्यातून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी कार्यवाही करुन संबंधित कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(१३) * ३५६२७ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २६२०५ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००९ रोजीच्या आर.टी.ई. कायद्याची अंमलबजावणी झाल्याने उच्च प्राथमिक वर्गांना शिकविणारे शिक्षक प्रशिक्षित पदवीधर असणे आवश्यक असून अशा शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर शिक्षक म्हणून पद मान्य करण्यात आले असून आर.टी.ई. कायद्यानुसार राज्यातील शाळांमध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी वरील “प्रशिक्षित पदवीधर” शिक्षकांना वेतनश्रेणी मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी व शिक्षकांकडून मागणी करण्यात आली असून याबाबत शासनाकडून कार्यवाही सुरु असल्याचे आश्वासन लोकप्रतिनिधी व शिक्षकांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

आर.टी.ई. कायद्यानुसार इयत्ता ६ ते ८ या वर्गासाठी ३ विषय शिक्षकांची नेमणूक करण्याची तरतूद आहे. त्यानुसार ६ ते ८ या वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांपैकी १/३ शिक्षकांना सेवाज्येष्ठतेप्रमाणे पदवीधर वेतनश्रेणी दिली जाते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील ई-पॉस मशिनमध्ये फेरफार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) * ३५२०० डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नाशिक जिल्ह्यात धान्य वितरणात पारदर्शकता आणण्यासाठी जिल्ह्यातील २६०९ रास्तभाव दुकानामध्ये ई-पॉस (पॉईन्ट ऑफ सेल) मशीन बसविण्याची सक्ती केली असून बायोमेट्रीक पध्दतीने लाभार्थ्यांना धान्याचे वाटप करण्याचे धोरण अंमलात आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील काही रास्तभाव दुकानांच्या मालकांनी ई-पॉस मशीनमध्ये फेरफार करुन धान्याचा गैरव्यवहार केल्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, परभणी जिल्ह्यात रास्तभाव धान्य दुकानदारांकडून ई-पॉस मशीनच्या सहाय्याने धान्य वितरीत करण्यात येत नसून लाभार्थ्यांचे आधार व्हेरिफिकेशन कमी करण्यात आल्याचेही माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ई-पॉस मशीनमध्ये गैरव्यवहार आणि कामात अनियमितता आढळलेल्या तीन रास्तभाव दुकानांचे परवाने अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास रद्द करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांची फसवणूक होवू नये याबाबत कार्यवाही करुन गैरप्रकार करणाऱ्या रास्तभाव दुकानांच्या मालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट** : (१) नाशिक जिल्हयासाठी २५९६ ई-पॉस मशीन उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत व लाभार्थ्यांना बायोमेट्रिक पध्दतीने धान्याचे वाटप सुरु केले आहे.
(२) हे खरे नाही.

नाशिक जिल्हयातील दोन रास्तभाव दुकानदारांनी ई-पॉस मशीनमध्ये फेरफार केला नसून माहे सप्टेंबर, २०१७ महिन्यात शिधावस्तू वाटप करण्यापूर्वीच सेल क्लोज (Sale Close) चे बटन कार्यान्वित केल्याने सेल बंद झाला होता. सदर प्रकरणी तहसिलदार नांदगाव यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.

परभणी जिल्हयातील सर्व ११८३ रास्तभाव दुकानांमध्ये ई-पॉस मशीन बसविण्यात आलेल्या असून माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये जिल्हयातील एकूण २,१४,६३३ पात्र शिधापत्रिका धारकांपैकी १,९३,७६८ शिधापत्रिकाधारकांना ई-पॉस मशीनव्दारे धान्य वितरीत करण्यात आलेले आहे. एकूण धान्य वितरणापैकी हे प्रमाण ९०.२८ % एवढे आहे. ई-पॉस मशीनवरून वितरीत धान्यापैकी आधार व्हेरिफाईड व्यवहारांची संख्या ८०५४९ असून हे प्रमाण ४१.५७ % आहे.
(४) नाशिक जिल्हयातील नांदगाव तालुक्यातील मौजे खादगांव व मौजे बोराळे येथील रास्तभाव दुकानधारकांनी धान्याचे पूर्ण वाटप करण्यापूर्वीच सेल क्लोज बटन कार्यान्वित केल्याने उर्वरित कालावधीत लाभार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने धान्य वितरण करता आलेले नाही. त्यामुळे, जाणीवपूर्वक सेल क्लोज केल्यासह इतर गंभीर अनियमितताबाबत सदर दोन दुकानांचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आलेले आहे.

तसेच, परभणी जिल्हयामध्ये इतर अनियमिततेबाबत दोषी आढळलेल्या दोन दुकानांचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आलेले आहेत.

(५) उपरोक्त प्रकरणी दोषी आढळलेल्यांची चौकशी करून दुकानांचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आलेले आहेत.

तसेच, रास्तभाव दुकानातून ई-पॉस मशीनव्दारे होणारी शिधावस्तूंची विक्री तपशील यामध्ये पारदर्शकता येण्यासाठी www.mahafood.gov.in या विभागाच्या संकेतस्थळावर जनतेसाठी उपलब्ध करुन दिला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विकास प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१५) * ३५६३८ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १९४ विकास प्रकल्प पर्यावरणाच्या मंजूरीविना प्रलंबित असल्याचे मा.केंद्रीय पर्यावरण मंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पांना पर्यावरणाची परवानगी मिळून या प्रकल्पांना गती देण्यासाठी राज्य शासनाने पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) सदर बाब केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या अखत्यारित असून, सदर प्रश्नाच्या वस्तुस्थितीची माहिती केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाकडून मागविण्यात आली आहे.

(२) व (३) याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केलेला आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना-२००६ च्या दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजीच्या सुधारणेनुसार १.५ लक्ष चौ.मि. पेक्षा कमी बांधकाम क्षेत्रफळ असणारे विकास प्रकल्प स्थानिक नियोजन प्राधिकरणांच्या अखत्यारित येतात, तसेच, ३ लक्ष चौ.मि. व त्यापेक्षा जास्त बांधकाम क्षेत्रफळ असणारे विकास प्रकल्प केंद्र शासनाच्या अखत्यारित येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याच्या पुरातत्व विभागाच्या सक्षमीकरणासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१६) * ३४९३३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या पुरातत्व विभागात १९६० सालापासून मंजूर असलेल्या २६३ पदांपैकी १६० पदे भरलेली असून, अद्यापही १०३ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील दुर्ग आणि स्मारकांची संख्या ४०० असून त्यातील ९० ते ९५ वास्तूंच्या दुरुस्तीची कामे तातडीने करणे गरजेचे असताना पुरातत्व विभागासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात केवळ २५ कोटी एवढी आर्थिक तरतूद करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागाच्या सक्षमीकरणासाठी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरुन आर्थिक तरतूद योग्य प्रमाणात वाढवण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.वित्तमंत्री आणि मा.सांस्कृतिक कार्यमंत्री यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीच्या अनुषंगाने पुरातत्व विभागाच्या सक्षमीकरणासाठी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) होय.

(४) पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयास पुरेसे मनुष्यबळ व आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भोजन भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबत

**(१७) * ३५१४३ श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन १९६६ पासून राज्यातील ग्रामीण भागातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी शासकीय विद्यानिकेतन या नावाने निवासी शाळा सुरु करुन गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची मोफत निवास व भोजनाची व्यवस्था केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भोजन भत्त्यामध्ये सन २००५ पासून म्हणजेच मागील १२ वर्षापासून कोणतीही वाढ केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भोजन भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) भोजन भत्त्यामध्ये वाढ करण्याची बाब तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अभियांत्रिकी शिक्षणाचा दर्जा सुधारण्याबाबत

**(१८) * ३४६७० श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्री.शरद रणपिसे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अभियांत्रिकी शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी महाविद्यालयाकडे चांगल्या दर्जाच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा अभाव व मागील ५ वर्षातील अहवालानुसार लागोपाठ ३० टक्क्यापेक्षा कमी झालेले प्रवेश आदि कारणामुळे महाविद्यालये बंद पडत असल्याने ५९ अभियांत्रिकी महाविद्यालये तसेच सुमारे ८०० अभियांत्रिकी महाविद्यालये बंद करण्याची नोटीस एआयसीटीई ने (ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन) अखिल भारतीय तंत्रशिक्षण मंडळाने संबंधित महाविद्यालयांना दिलेली असून त्यात महाराष्ट्र राज्यातील मोठया संख्येतील अभियांत्रिकी महाविद्यालयांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील ४०१ अभ्यासक्रम बंद करण्यास एआयसीटीई ची परवानगी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील किती अभियांत्रिकी महाविद्यालये बंद करावी लागणार आहेत व ती बंद करण्याची तसेच ४०१ अभ्यासक्रम बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अभियांत्रिकी शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी केंद्र शासनाकडे चौकशी करण्याबाबत तसेच उक्त नोटीसव्दारे जी महाविद्यालये बंद करावी लागणार आहेत त्यातील विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे अथवा करण्याचे प्रस्तावित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.

सलग ५ वर्षे व चालू शैक्षणिक वर्षात ३० टक्के पेक्षा कमी प्रवेश झालेले अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्षापासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेने बंद करण्यासाठी संस्थेने परिषदेकडे प्रस्ताव सादर करुन मान्यता घेण्याची तरतूद अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या ॲप्रुवल प्रोसेस हॅण्डबुकमध्ये करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्‌यापीठाची स्थापना करण्यात आली आहे.

तसेच संस्था/अभ्यासक्रम बंद करण्यात आल्यास विद्‌यार्थ्यांना अन्य नजिकच्या संस्थांमध्ये स्थलांतरीत करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुंभेफळ (जि.औरंगाबाद) येथील रेडिको कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(१९) * ३५३५७ श्री.धनंजय मुंडे, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभेफळ (जि.औरंगाबाद) येथील रेडिको या मद्‌यनिर्मिती कारखान्यातील दुषित पाणी मागील पाच वर्षांपासून १० ते १५ गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या सुकना धरणात जात असल्यामुळे कुंभेफळ गावातील नागरिकांच्या, गुरांच्या, शेतीच्या तसेच पशुपक्षांच्या आरोग्याची गंभीर समस्या निर्माण झाल्याच्या तक्रारी नागरीकांनी महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ व जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना करुनही या अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून या गावातील व परिसरातील विहीरी, बोअरवेल्स, हातपंपातुनही प्रदुषणयुक्त लाल पाणी येत असुन तेथील जमीन नापिक झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारींच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत सदर कारखाना प्रदुषणकारी घटक पर्यावरणात सोडत असून त्यासंबंधात उपाययोजना करण्याचे निर्देश शासनाने देवूनही त्याचे अनुपालन करत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार संबंधित दोषी अधिकारी तसेच सदरच्या उद्‌योग घटकाविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) अंशत: हे खरे आहे, मे. रेडिको एनव्ही डिस्टलरीज या मद्य निर्मिती करणाऱ्या उद्योगाबाबत माहे सप्टेंबर, २०१७ व ऑक्टोबर, २०१७ दरम्यान औदयोगिक सांडपाणी सोडल्याबाबतच्या तक्रारी आल्या होत्या,
(२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी केली आहे. सदर पाहणीच्यावेळी माहे सप्टेंबर, २०१७ व ऑक्टोबर, २०१७ मध्ये अचानक मोठा पाऊस पडल्यामुळे खत निर्मितीच्या उघडया जागेवर पाण्याचा लोट आल्यामुळे सदरील सांडपाणी पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या नाल्याव्दारे मे.वोखार्ड कंपनीच्या खुल्या जागेत असलेल्या पाझर तलावात मिसळून पाझर तलावाचा ओव्हर फ्लो नाल्यात वाहत असल्याचे निदर्शनास आले. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मे.रेडीको एनव्ही डिस्टलरीज या उद्योगास दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली व दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वैयक्तिक सुनावणी घेऊन अंतरिम निर्देश पारित करण्यात आले व सदरीत उद्योगाकडून रुपये १० लाखाची बँक हमी घेण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर विदयापीठाचे नामांतरण करण्याबाबत

**(२०) * ३५०४४ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ३१८६२ ला दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर विदयापीठाच्या नामांतराचा मुद्दा काही वर्षापूर्वी विदयापीठाच्या विदयापरिषदेकडे संमतीसाठी गेला असता २८ संघटनांनी विदयापीठाला कोणाचे नाव दयावे यासाठी वेगवेगळया नावांचा आग्रह धरला असून याबाबतचा ठराव विदयापरिषदेने राज्य शासनाकडे सादर केलेला आहे व सदर ठरावावरील कार्यवाही अदयापही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर विदयापीठाला ग्रामदैवत सिध्देश्वर किंवा महात्मा बसवेश्वर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याबरोबरच माता जिजाऊ यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी विविध समाज घटकांतून होत असून त्यासाठी सोलापूर जिल्हयात आंदोलने सुरु आहेत तसेच दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास काही संघटनांनी यासाठी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या उपस्थितीत सोलापूर येथे एका कार्यक्रमात तीव्र आंदोलन केल्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सोलापूर विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाचे नामांतर करण्यास नकार देण्याबाबतचा ठराव शासनास कळविल्यानंतरही दिनांक २६ मे, २०१६ रोजी शासनस्तरावर झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबत आश्वासित केल्याप्रमाणे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही, सोलापूर विद्यापीठ नामांतरणाबाबत विविध घटकांकडून प्राप्त झालेले २७ निवेदने अधिसभेच्या दिनांक १५/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत ठेवण्यात आली होती तद्नंतर दिनांक २३/०५/२०१७ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये सोलापूर विद्यापीठाच्या नामांतरणा संदर्भातील विषय विचारार्थ आला असता एकूण प्राप्त ३० निवेदनावर पुनश्च: सविस्तर चर्चा करण्यात येऊन भविष्यात जातीय तेढ निर्माण होऊन विद्यापीठाच्या निकोप विकासाला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी सोलापूर विद्यापीठाचे नाव सोलापूर विद्यापीठच राहील असा पूर्वी सर्वानुमते घेण्यात आलेला निर्णय कायम ठेवण्याबाबत विद्यापीठाने कळविले आहे.

(२) विविध दैनिक वृत्त पत्रावरुन सदरचीबाब निदर्शनास आल्याचे विद्यापीठाने नमूद केले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सोलापूर विद्यापीठाच्या नामविस्ताराबाबत विविध संघटना व राजकीय पक्ष यांच्याकडून प्राप्त झालेली निवेदने/पत्रे दिनांक २३/०५/२०१७ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आली होती. भविष्यात जातीय तेढ निर्माण होऊन विद्यापीठाच्या निकोप विकासाला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी सोलापूर विद्यापीठाच नाव सोलापूर विद्यापीठच राहील असा पूर्वी सर्वानुमते घेण्यात आलेला निर्णय कायम ठेवण्याबाबत विद्यापीठाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयात अतिरिक्त ठरलेल्या मुख्याध्यापक आणि प्राथमिक शिक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(२१) * ३६०१९ श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयात १४५५ जिल्हापरिषद शाळांमधील ४१३ मुख्याध्यापकांची पदे मंजूर असल्याने संच मान्यतेनुसार ३९३ मुख्याध्यापक अतिरिक्त ठरले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील अतिरिक्त ठरलेल्या मुख्याध्यापक आणि प्राथमिक शिक्षकांचे समायोजन न झाल्याने वेतनाची देयके प्रलंबित असल्याने दिवाळीत शिक्षकांचे वेतन झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सरल प्रणालीद्वारे सन २०१६-१७ ची आस्थापना सूची नुसार शिक्षकांची पदे अद्ययावत केल्याने शालर्थ प्रणालीत संचमान्यतेप्रमाणे वेतन काढणेत आलेले आहे. संचमान्यतेमध्ये ३९३ मुख्याध्यापक पदे अतिरिक्त झालेली आहेत. त्यांचे वेतन offline काढणेसाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्यात डाळीसह कांदे, खाद्यतेल तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत वाढ झाल्याबाबत

**(२२) * ३५९८० श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सणासुदीच्या दिवसात डाळीसह कांदे, खाद्यतेल तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान वाढ झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार डाळीसह कांदे, खाद्यतेल तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंवरील किंमतीवर नियंत्रण ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये सणासुदीच्या काळात मागणी वाढल्याने डाळीसह कांदे, खाद्यतेल तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत वाढ झाली होती. त्याअनुषंगाने कांद्याची नफेखोरी व साठेबाजी रोखण्याच्या दृष्टीकोनातून जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ व काळा बाजार प्रतिबंध आणि जीवनावश्यक वस्तूंचा सुरळीत पुरवठा अधिनियम, १९८० अंतर्गत कठोर कारवाई करण्याबाबत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्य शासनाने दिनांक २८/१२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये तूर / तूरडाळ, खाद्यतेल, खाद्यतेल बीया व इतर कडधान्य यांच्या किंमती नियंत्रित ठेवण्याच्या अनुषंगाने उपाययोजना (Action Plan) तयार करण्यासाठी दर नियंत्रक समिती (Price Monitoring Committee) गठित केली आहे.

राज्यात डाळींचे दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून डाळींसाठी दर नियंत्रक कायद्याचे प्रारुप तयार करण्यात आले आहे. सदर प्रारुपाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने अतिरिक्त माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य शासनास कळविलेले आहे. सदरहू माहिती केंद्र शासनास सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पदव्युत्तर प्रवेशासाठी सी.ई.टी. अनिवार्य केल्यामुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिल्याबाबत

**(२३) * ३५००४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पदव्युत्तर प्रवेशासाठी सी.ई.टी. अनिवार्य केल्यामुळे अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिल्याचे मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या निदर्शनास दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी आणून दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात सी.ई.टी. साठी ३८ हजार जागांपैकी १९०७१ विद्यार्थ्यांनी अर्ज केले असून त्यापैकी १७२०० विद्यार्थी पात्र झाले असल्याने सुमारे २०८०० जागा माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील लाखो विद्यार्थी उक्त पद्धतीमुळे प्रवेशापासून वंचित राहिले असून सी.ई.टी. ही शासनाचे उत्पादन वाढीसाठी घेण्यात येत असल्याचे मत विद्यार्थी व्यक्त करत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पदव्युत्तर प्रवेशासाठी सी.ई.टी. अनिवार्य करण्याच्या निर्णयाचा फेरविचार करुन ही पध्दत बंद करुन पदव्युत्तर शिक्षण प्रणालीच्या रिक्त जागा भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

अ) दिनांक २४/०८/२०१७ रोजी विद्यापीठांने तात्काळ प्रवेश प्रक्रिया (Spot Admission) राबविली होती या प्रवेश प्रक्रियेत सरसकट सर्व विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देण्यात आली होती. याबाबत वर्तमान पत्र तसेच एमसीएन या चॅनलवर जाहिरात देण्यात आली होती. अशा प्रकारे दोन प्रवेश फेऱ्या व तद्नंतर स्पॉट ॲडमिशन फेरी घेण्यात आली.

ब) फ्लॅशबोर्डव्दारे महाविद्यालयांना कळविण्यात आले होते.

क) विद्यार्थ्यांना प्रवेशपूर्व परिक्षेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठ परिसरात व विविध महाविद्यालयात मार्गदर्शन केंद्र उभारण्यात आली होती.

ड) प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना रिक्त जागेवर प्रवेश देण्याबाबत विद्यापीठाने संबंधितांना परिपत्रकाव्दारे कळविले होते.

ई) प्रवेशपूर्व परिक्षा प्रथमच घेण्यात येत असल्यामुळे वर्तमान पत्रातील जाहिरातींकडे लक्ष न दिल्यामुळे काही विद्यार्थ्यांना प्रवेशपूर्व परिक्षेबाबत कल्पना नव्हती.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयात पेयजल योजना पूर्ण करण्याबाबत

**(२४) * ३५८८८ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात पेयजल मधील अपूर्ण असलेल्या ५३० योजनांच्या पुर्ततेसाठी समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने तालुकास्तरीय योजनांची बक्षिसपत्रे, कागदपत्रांची पूर्तता केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अपूर्ण योजना मार्गी लावण्यासाठी मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उक्त समितीने अपूर्ण योजनेसंदर्भात ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचा तालुकास्तरावर आढावा घेऊन योजनांची बक्षिसपत्रे व कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन योजना पूर्ण करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत.

(३) सदर अपूर्ण योजना मार्गी लावण्यासाठी जिल्हा वार्षिक समितीने राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमासाठी सन २०१७-१८ साठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अल्फिया शेख (गिट्टीखदान, नागपूर) या खेळाडूस आर्थिक सहाय्य देण्याबाबत

**(२५) * ३४८२० श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक २९२८९ ला दिनांक २५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्फिया शेख (गिट्टीखदान, नागपूर) या पॉवर लिफ्टींग खेळाडूस आर्थिक सहाय्य देण्याबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर खेळाडूस आर्थिक सहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.
(२) राज्य क्रीडा विकास निधीतून अर्थसहाय्य मंजुरीसाठी समितीच्या पुढील बैठकीत सदर प्रस्ताव विचारार्थ ठेवण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बाडापोखरण (ता.डहाणू, जि.पालघर) नळ पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(२६) * ३५३२८ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ३२७४७ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाडापोखरण (ता.डहाणू, जि.पालघर) नळ पाणीपुरवठा योजना सन २००६ मध्ये कालबाह्य झाल्यामुळे उक्त योजनेच्या नुतनीकरणासाठी रुपये ४३ कोटींचा निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेच्या नुतनीकरणाचे काम माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये पूर्ण होणार होते, परंतु अद्यापी या सर्व योजनांची कामे पूर्ण करण्यात आली नसल्याने स्थानिक नागरिकांचे पिण्याच्या पाण्याविना हाल होत असल्यामुळे त्यांनी मोर्चा काढण्याचा इशारा शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाडापोखरण नळ पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे, खरे नाही.

(३) सदर योजनेची कामे ८९ % पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. योजनेतील समाविष्ट एकूण ३३ गावांपैकी २९ गावांना फेब्रुवारी, २०१५ पासून टप्प्या टप्प्याने चाचणी तत्वावर पाणीपुरवठा सरु करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून सुधारीत कोड ट्रान्सफॉर्मरची तपासणी करुन मान्यता मिळाल्यानंतर, विद्युत जोडणी घेऊन योजनेतील सर्व गावांना पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील प्रदूषित पाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२७) * ३५८०८ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीत सर्वाधिक रासायनिक कारखाने असून येथील डुकॉल ऑरगॅनिक्स ॲण्ड कलर्स कंपनीतून सोडण्यात आलेल्या प्रदूषित पाण्यामुळे प्राणी व झाडे यांच्या रंगामध्ये बदल होऊन त्यांच्या जिवीतास धोका निर्माण झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, तसेच मासळयांवर प्रक्रिया करणाऱ्या कंपन्यामुळेही प्रदूषण होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रासायनिक कारखान्यातील पाण्यावर कोणतीच प्रक्रिया न करता बाहेर सोडत असल्यामुळे कासाडी नदी प्रदुषित झाल्याची नोंद जागतिक पातळीवरील वृत्तपत्रांनी घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तळोजा औद्योगिक वसाहतीतील रासायनिक कंपन्यावर तसेच राज्यातील अनेक औद्योगिक वसाहतीतील कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या पाण्यामुळे नद्या, ओढे प्रदूषित झाले असून सदर कारखान्यांनी नद्या व ओढे यात पाणी सोडण्यापुर्वी पाण्यावर प्रक्रिया करणे आवश्यक असतानाही प्रक्रिया न करता नद्या, ओढे यात सोडत असल्यामुळे उक्त कारखान्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये डुकॉल ऑरगॅनिक्स अॅण्ड कलर्स तळोजा या कंपनीतुन सोडण्यात येणाऱ्या प्रदूषित पाण्यामुळे प्राणी व झाडे यांच्या रंगामध्ये बदल झाला हे खरे नाही. तथापि, कंपनीतील रंगाचे कण पसरून तो रंग लागल्यामुळे ३ व ४ श्वानांचा रंग निळा झाला होता. तथापि, माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये मत्स्य प्रक्रिया करणाऱ्या उद्योगामुळे प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नदी, नाला व ओढा यामध्ये विना प्रक्रिया सांडपाणी सोडण्यास कोणत्याही कारखान्यास परवानगी देण्यात आलेली नाही. तसे आढळल्यास उद्योगाचे उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. जानेवारी, २०१७ पासून ३३ उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्याबाबत

**(२८) * ३४९४६ अॅड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ३३०७३ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकृषि विद्यापीठांचे कार्यक्षेत्र चार ते पाच जिल्हयांचे मिळून निश्चित करण्यात आले असून विद्यापीठांचे मुख्य केंद्र असलेला जिल्हा वगळून त्या क्षेत्रातील इतर जिल्हयातील विद्यार्थ्यांना कामासाठी अनेक वेळा लांब अंतरावरील विद्यापीठाच्या ठिकाणी जावे लागत असल्यामुळे विद्यापीठांची जिल्हानिहाय उपकेंद्रे स्थापन करावीत, अशी मागणी विद्यार्थी व पालकांकडून झाल्यामुळे ठाणे, कल्याण व रत्नागिरी येथे सन २०१४ व २०१५ पासून मुंबई विद्यापीठांतर्गत उपकेंद्र सुरु करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच धर्तीवर नवनिर्वाचित पालघर आदिवासी जिल्हयात मुंबई विद्यापिठाचे उपकेंद्र सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीप्रमाणे मुंबई विद्यापीठाने सकारात्मक निर्णय घेतला असल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अकृषि विद्यापीठांतर्गत होणाऱ्या उपकेंद्रासाठी धोरण ठरविण्यासाठी माजी प्र.कुलगुरु डॉ.योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केव्हा व कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई विद्यापीठ प्रशासनाने घेतलेल्या सकारात्मक निर्णयानुसार पालघर या आदिवासी जिल्हयात विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे मुंबई विद्यापिठाचे उपकेंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

(३) राज्यातील अकृषी विद्यापीठांतर्गत होणाऱ्या उपकेंद्रासाठी धोरण विहित करण्यासाठी माजी प्र.कुलगुरु डॉ.योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवालातील आर्थिक भारासंदर्भात केलेल्या शिफारशी तपासून निर्णय घेण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात भुजल पातळीत घट झाल्याबाबत

**(२९) * ३४९७९ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १०० तालुक्यातील १६० गावांतील भुजल पातळी ३ मीटर तर ३०८ गावांतील २ ते ३० मीटर आणि ९१३ गावांतील १ ते २० मीटर पेक्षा जास्त इतकी भुजल पातळीत घट झाल्याचे भुजल सर्व्हेक्षण आणि विकास नियंत्रण यंत्रणेने केलेल्या सर्व्हेक्षणात दिनांक २७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भुजल पातळीत घट झालेल्या एकूण ११८१ गावात विहिरीत पावसाचे पाणी सोडून भुजल पुनर्भरण करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मौजे माळघर (ता.जव्हार, जि.पालघर) मधील उंच डोंगरावर राहणाऱ्या आदिवासी पाडयातील भुजल पातळी कमी झालेली असून त्या गावांतील विहिरीत पावसाचे पाणी सोडून भुजल पुनर्भरण करण्यात येत नसल्याचे दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विहिरीत पावसाचे पाणी सोडून भुजल पुनर्भरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत राज्यात निश्चित करण्यात आलेल्या ३९२० निरीक्षण विहीरींची भूजल पातळीच्या नोंदी माहे सप्टेंबर, जानेवारी, मार्च व मे महिन्यात घेण्यात येते.

राज्यामध्ये माहे सप्टेंबर, २०१७ अखेर पडलेले पर्जन्यमान व त्यामधील २०% पेक्षा जास्त तूट लक्षात घेता, सप्टेंबर, २०१७ मधील निरीक्षण विहिरींतील पाणी पातळीची मागील ५ वर्षाची सप्टेंबर महिन्यातील सरासरी भूजल पातळीशी तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला असून राज्यात ३५३ तालुक्यापैकी २३० तालुक्यांमध्ये १ ते २ मी. एवढी घट आढळून आलेली गावे ५५८५ व २ ते ३ मी. एवढी घट आढळून आलेली गावे २५८७ असून ३ मी. पेक्षा जास्त भूजल पातळीत घट असणारी गावे १९९५ इतकी आहेत.

(२) हे खरे नाही.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण करण्याकरीता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) व जलयुक्त शिवार अभियान राज्यात राबविण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

जव्हार तालुक्यातील सरासरी भूजल पातळीत तीव्र घट झाल्याचे आढळून येत नाही.

पालघर जिल्हयातील जव्हार तालुक्यामध्ये माहे सप्टेंबर, २०१७ अखेर पडलेले पर्जन्यमान व त्यामधील २०% पेक्षा जास्त तूट लक्षात घेता सप्टेंबर, २०१७ मधील निरीक्षण विहीरींतील पाणी पातळीचा मागील ५ वर्षाची सप्टेंबर महिन्यातील सरासरी भूजल पातळीशी तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला असून तालुक्यामध्ये १ ते २ मी. मध्ये घट आढळून आलेली गावे ३ इतकी आहेत व २ ते ३ मी. व ३ मीटरपेक्षा जास्त घट आढळून आलेली गावे नाहीत.

(४) राज्यामध्ये भूजल पातळी वाढविण्यासाठी जलयुक्त शिवार, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) या योजना राबविण्यात येत आहेत. तसेच जलयुक्त शिवार अभियानांतर्गत भूजलाचे पुनर्भरण नियोजनाकरीता जलनिर्धारण व लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन, वेळसापेक्ष भूजल पातळी संनियंत्रण, निरीक्षण विहीरीचे जाळे वाढविणे व जलवेधशाळा बळकटीकरण करणे हे उपप्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडकरी खाण (चेंबूर, मुंबई) येथील सिमेंट प्रकल्प बंद करण्याबाबत

**(३०) * ३५६७१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडकरी खाण, माहूल (चेंबूर, मुंबई) येथील सिमेंट प्रकल्प बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिल्यानंतर दोन महिन्याचा कालावधी उलटल्यानंतरही हा प्रकल्प सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या धुळीमुळे परिसरातील नागरिक श्वसनाच्या आजाराने त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आदेश देऊनही सदर सिमेंट प्रकल्प बंद न करण्याची व सदर कंपनीवर कारवाई न करण्याची कारणे तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकल्पास जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ व हवा प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम १९८१ मधील तरतूदीनुसार दिनांक १०/०७/२०१७ रोजी उत्पादन बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिले आहेत. सदर आदेशानुसार प्रश्नाधीन प्रकल्पाचे उत्पादन बंद असल्याचे याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक १६/११/२०१७ रोजी केलेल्या पाहणी दरम्यान निदर्शनास आले आहे.

-----------------

## महातळा (ता.हदगांव, जि.नांदेड) गावात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेचे काम पुर्ण करण्याबाबत

**(३१) * ३५५७२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महातळा (ता.हदगांव, जि.नांदेड) गावात सन २०१२-१३ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल या कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजना राबविली असून या योजनेंतर्गत दोन वर्षाच्या कालावधीमध्ये विहिर पाईपलाईन व पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण करावयाचे होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे वेळेत पूर्ण न झाल्याने ग्रामस्थांना पाणीटंचाईस सामोरे जावे लागत असल्याने ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांविरोधात तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरची कामे पूर्ण करण्याबाबत तसेच संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) होय.

श्री.आनंदराव सुर्यवंशी रा.महातळा या ग्रामस्थांनी दिनांक २६/७/२०१७ च्या तक्रारी निवेदनाने तक्रार नोंदविली आहे.
(३) सदर तक्रारी संदर्भात जिल्हा परिषद उपविभाग किनवट यांनी चौकशी केली होती.

सदर चौकशी अहवालानुसार समितीकडे त्यावेळी शिल्लक असलेला निधी वसुल करण्याची शिफारस केली होती.

परंतु दरम्यानच्या काळात समितीने योजनेची कामे हाती घेवून भौतिकदृष्टया पुर्ण केली व पाणीपुरवठा सुरळीत सुरु केला. आता उर्वरीत किरकोळ कामे व वितरण व्यवस्थेचे काम हाती घेऊन योजना पूर्ण करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याची आवश्यकता भासली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील वक्फ मालमत्तांवरील इतरांची नावे हटविणेबाबत

**(३२) * ३५४४९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयातील वक्फ मालमत्ता, सातबारा व प्रॉपर्टी कार्ड यावरील इतरांची नावे हटवून त्या सर्व मालमत्तांवर वक्फ मंडळांची नावे लावण्याबाबत तसेच त्या मालमत्तेवर वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार अशी नोंद घेणेबाबत प्रधान सचिव (महसूल) यांनी दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासन आदेश जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासन आदेशाप्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही न करता तसेच जिल्हयातील सर्व वक्फ मालमत्तांवर वक्फ मंडळाचे नाव नोंदविणे व वक्फ प्रतिबंधक सत्ता प्रकार अशी नोंद घेण्याबाबत कारवाई न करणाऱ्या उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांची चौकशी करुन त्यांच्यावर कार्यवाही करावी अशी लेखी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्ता व पत्रकार यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाच्या नावे करण्याबाबत कार्यवाही करुन दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.
(२) होय, एका सामाजिक कार्यकर्त्याने याबाबत तक्रार केली आहे. तथापि, जिल्हाधिकारी, परभणी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार परभणी जिल्हयातील सर्व वक्फ मालमत्तांवर वक्फ मंडळाचे नांव नोंदविणे व "वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार" अशी नोंद घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असून जिल्हयातील ३१९ वक्फ मालमत्तापैकी १३५ वक्फ मालमत्तेची ७/१२ वर नोंद घेण्यात आली आहे. उर्वरित १८४ वक्फ मालमत्ताच्या प्रकरणात तक्रारी/न्यायप्रविष्ठ असल्याने ७/१२ वर नोंद घेता आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेंतर्गत अनुदान देण्याबाबत

**(३३) * ३५९५९ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील शालेय शिक्षण विभागाच्या मोफत गणवेश योजनेंतर्गत जवळपास १५७० शाळांमधील सुमारे ३५ हजार विद्यार्थी अनुदानापासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील नागरिक अशिक्षित व मागासलेले असल्याने शासनाने विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना पुरेशी माहिती न दिल्याने ते अनुदानापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेंतर्गत अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश योजनेचे गडचिरोली जिल्हयामध्ये एकूण ६३५७८ विद्यार्थी पात्र असून त्यांना रुपये २५४.३१ लक्ष इतकी रक्कम संबंधित शाळांच्या शाळा व्यवस्थापन समितीकडे वितरीत करण्यात आले आहेत. ६३५७८ पात्र विद्यार्थ्यापैकी ५२७२१ विद्यार्थ्यांची खाती उघडण्यात आली असून यापैकी ३५४६९ पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये लाभाची रक्कम वर्ग करण्यात आली आहे. उर्वरित विद्यार्थ्यांची बँकेत खाती न उघडल्यामुळे त्यांच्या खात्यावर योजनेच्या लाभाचे पैसे वर्ग करता आलेले नाहीत. तथापि, सदर लाभार्थ्यांचे बँकेत खाते उघडण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धानला (ता.लाखनी, जि.भंडारा) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत

**(३४) * ३५८९९ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धानला (ता.लाखनी, जि.भंडारा) पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थीच शालेय पोषण आहाराची भांडी घासत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भविष्यात असे प्रकार घडू नये याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) दोषी मुख्याध्यापिकेची बदली करण्यात आली असून भविष्यात असे प्रकार घडू नयेत, याची दक्षता घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत

**(३५) * ३५४५९ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील शासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१७ चे वेतन ऐन दिवाळी येवूनही बॅक खात्यात जमा झाले नसल्याचे दिनांक ६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राध्यापकाचे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन न होण्याची कारणे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राध्यापकांचे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) अकृषी विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना वेतन अदायगीसाठी लागू केलेली एचटीई सेवार्थ प्रणाली तांत्रिक कारणामुळे बंद होती. सदर एचटीई सेवार्थ प्रणाली सुरु झाल्यानंतर माहे ऑगस्ट व सप्टेंबर २०१७ चे वेतन अदायगीची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंडवाना विद्यापीठाने चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील महाविद्यालये बंद केल्याबाबत

**(३६) * ३४८६८ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील निकष पूर्ण न करणारे ३० महाविद्यालये गोंडवाना विद्यापीठाने बंद केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महाविद्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालयातील कार्यरत कर्मचारी, प्राध्यापक यांना सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

विद्यार्थी संख्येचा अभाव तसेच, महाविद्यालयांनी संलग्निकरण न केल्यामुळे संबंधित महाविद्यालय बंद करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) विद्यापीठाच्या माहितीनुसार सद्य:स्थितीत ३० कायम विनाअनुदानित महाविद्यालये बंद अवस्थेत असल्याने संबंधित महाविद्यालयांत कर्मचारी कार्यरत नाहीत. तसेच, सदरची महाविद्यालये ही कायम विनाअनुदानित तत्वावर असल्यामुळे या महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या समावेशाचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील घरगुती गॅसचा काळाबाजार रोखण्याबाबत

**(३७) * ३५५०४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यात घरगुती गॅसचा काळाबाजार वाढला असून घरगुती गॅस ग्राहकांकडून किंमतीपेक्षा रुपये २० ते २५ अतिरिक्त घेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांनी घरगुती गॅस बुकींग केल्यानंतर गॅस सिलिंडर ४ ते ५ दिवसांनी मिळतो मात्र हॉटेल व चारचाकी वाहनांसाठी अतिरिक्त पैसे घेवून गॅस त्वरीत वितरीत करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गॅस वितरण एजन्सीकडून होणारी फसवणुक थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात शालेय पोषण आहार पुरवठादार नेमण्याबाबत

**(३८) * ३५१९९ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात शालेय पोषण आहार पुरवठादारांचे कंत्राट संपल्याने पोषण आहाराची जबाबदारी आहार शिजवणाऱ्या यंत्रणेकडेच देण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेच्या मुख्याध्यापक, बचतगट इत्यादी यंत्रणा आर्थिकदृष्टया सक्षम नसल्याने पोषण आहाराचा प्रश्न मार्गी लागत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन फुलंब्री तालुक्यात पोषण आहार पुरवठादार नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत धान्यादी मालाची खरेदी करण्यासाठी संबंधित शाळेच्या अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांवर जबाबदारी देण्यात आली असून तांदळाचा पुरवठा पुरवठेदारामार्फत करण्यात येत आहे. याअंतर्गत अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांनी १५ दिवसांकरिता धान्यादी माल खरेदी करुन शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोषण आहार शिजवून द्यावयाचा आहे. सदर १५ दिवसाची देयके मुख्याध्यापकांना सादर केल्यानंतर ती अदा करण्याची तरतूद करण्यात आली आहे.
(३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागात तांदळाचा पुरवठा आणि ग्रामीण भागात तांदूळ व इतर धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी औरंगाबाद जिल्ह्यामध्ये माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये ई-निविदा प्रक्रियेद्वारे पुरवठेदार नियुक्त करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षक पात्रता (टीईटी) परिक्षेमध्ये शिक्षक नापास झाल्याबाबत

**(३९) * ३५२७० श्री.रविंद्र फाटक, श्री.जगन्नाथ शिंदे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१२ पासून शिक्षक भरती बंद असतानाही शिक्षक पदी नियुक्तीसाठी सन २०१३ पासून शिक्षक पात्रता परिक्षा टीईटी होत असून आतापर्यंत ५९ हजार ११६ उमेदवार या परिक्षेत पात्र ठरलेले असतानाही नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण हक्क कायद्याच्या तरतूदीनुसार प्राथमिक शिक्षकांच्या नेमणूकांसाठी शिक्षक पात्रता चाचणी (टीईटी) उत्तीर्ण करणे सक्तीचे केल्याने शिक्षणशास्त्र पदविका (डीएड) धारण करणारे शिक्षकच टीईटीसाठी पात्र ठरतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू टीईटी परिक्षेच्या संदर्भात शिक्षकांनी मा.शालेय शिक्षण मंत्री व शिक्षण संचालक आदींकडे लेखी निवेदनाद्वारे मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यात पूर्वी वस्तीशाळा स्वंयसेवक म्हणून काम करणारे डीएड व टीईटी नसणारे सुमारे ९ हजाराहून अधिक अप्रशिक्षित शिक्षक कार्यरत असून शालेय शिक्षणासाठी दर्जेदार शिक्षक मिळावे यासाठी घेण्यात येणाऱ्या चौथ्या शिक्षक पात्रता परिक्षेत (टीईटी) ९६ टक्के शिक्षक नापास झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर परिक्षेत पहिली ते पाचवीच्या वर्गासाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेत केवळ ४.२७ टक्के तर सहावी ते आठवीच्या वर्गासाठी घेण्यात येणाऱ्या शिक्षकांच्या परिक्षेत २.३० टक्केच शिक्षक उत्तीर्ण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वयंसेवकांना टीईटीच्या अटीतून वगळण्यासंदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) शिक्षक पात्रता परीक्षा ही प्राथमिक शिक्षक पदाकरीता पात्र अथवा अपात्र अशी अहर्ता निश्चित करणारी परीक्षा आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) प्राथमिक शिक्षक पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अहर्ता दिनांक २८/०२/२०१९ पर्यंत प्राप्त करण्याच्या अटीच्या अधिन राहून वस्तीशाळा शिक्षकांना जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत सामावून घेण्यात आलेले आहे. सदर वस्तीशाळा शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षेमधून वगळण्याबाबत केंद्र शासनास दिनांक १२ मे, २०१६ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे. त्यांचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

माहे जुलै, २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेत पेपर क्र.१ मध्ये ४.१३ टक्के तर पेपर क्र.२ मध्ये २.२२ टक्के उमेदवार पात्र ठरले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समुद्रपूर (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील पुरवठा निरिक्षकाविरुध्द प्रस्तावित शिस्तभंगविषयक कारवाई पूर्ण करण्याबाबत

**(४०) * ३५२९९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड : तारांकित प्रश्न क्रमांक ३३६३० ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रपूर (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील पुरवठा निरिक्षकाने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान गैरव्यवहार केल्याने संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी त्यांची बदली सेवा जिल्हा पुरवठा कार्यालय, वर्धा येथे करुन कारणे दाखवा नोटीस दिली असून सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी, वर्धा यांनी उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांना प्राथमिक चौकशीत पुरवठा निरिक्षक, समुद्रपूर यांच्याविरुध्दच्या तक्रारीत सत्यता आढळून आली असून संबंधित पुरवठा निरिक्षकाविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे असा अहवाल जिल्हाधिकारी, वर्धा यांना दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित पुरवठा निरिक्षकाविरुध्द प्रस्तावित केलेल्या शिस्तभंग विषयक कारवाईचे थोडक्यात स्वरुप काय आहे व उक्त कारवाई केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.

(२) होय.

(३) संबंधित पुरवठा निरिक्षकाविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ खाली कारवाई सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खांबोरा व ६० गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत

**(४१) * ३६४४७ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खांबोरा व ६० गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील ४४ गावांना अकोट ८४ खेडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणीपुरवठा करण्याचा, आकस्मिक पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तांत्रिक मंजूरीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, अमरावती यांच्याकडे दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावाला तांत्रिक मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) सदर प्रस्तावास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अमरावती यांनी दिनांक २०/११/२०१७ रोजी तांत्रिक मंजुरी दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील टंकलेखन संस्था बंद करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(४२) * ३६४८४ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कार्यालयात टंकलेखन मशीन्सची आवश्यकता नसल्याच्या कारणामुळे यापुढे टंकलेखन अभ्यासक्रम बंद केला जाईल असा निर्णय राज्य शासनाने दिनांक ३१ आक्टोबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सुमारे चार हजार टंकलेखन संस्थेचे संस्थाचालक तसेच मेकॅनिक, टंकलेखन मशिनरीचे सुटे भाग विक्रेते व इन्स्ट्रक्टर यांची पर्यायी व्यवस्था शासनाने केलेली नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये संगणक टंकलेखन अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आली होती. याबरोबरच सदर शासन निर्णयान्वये दिनांक ३१ मे, २०१५ पर्यंत मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम टप्याटप्याने बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम चालू ठेवण्यास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली असून दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम चालू ठेवण्यास दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव येथे खोबरा कीसमध्ये तांदळाच्या चुरीची भेसळ झाल्याबाबत

**(४३) * ३६८२८ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव येथे खोबरा कीसमध्ये तांदळाच्या चुरीची भेसळ होत असून ठिकठिकाणी भेसळयुक्त खाद्य पदार्थांचीही विक्री होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकाराची तक्रार प्राप्त झाल्यानंतरही अन्न व औषध प्रशासनामार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी व्यक्तींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) व (२) खोबरा किसमध्ये तांदळाच्या चुरीची भेसळ होत असल्याची बातमी “दिव्य मराठी” या दैनिकामध्ये दिनांक १४/०८/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती, ही बाब खरी आहे.

सदर बातमीमध्ये दुकानदाराने "दिव्य मराठी" या दैनिकामध्ये दिलेल्या मतानुसार सागर ब्रँन्डचा उल्लेख आहे. परंतु सागर ब्रॅन्डचा साठा तपासणीवेळी उपलब्ध नसल्याने व त्याची खरेदी व विक्री सदर पुरवठादाराने बंद केली असल्याने सदर ब्रॅन्डमध्ये भेसळ होती किंवा नाही हे सिध्द होवू शकले नाही. परंतू सदर दुकानात उपलब्ध इतर खोबरा कीसच्या ब्रँन्डची चौकशी केली असता कोणत्याही प्रकारची भेसळ आढळून आली नाही.

(३) उक्त पेढीतुन उपलब्ध साठ्यातून घेतलेल्या खोबरा कीसच्या नमुन्यांचा अहवाल प्राप्त झाला असून त्यामध्ये तांदळाच्या चुरीची भेसळ आढळून आलेली नाही. तथापि तपासणीच्या आधारे लेबलदोष आढळून आल्याने सदर पेढीविरुध्द न्यायनिर्णयासाठी प्रकरण दाखल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ऐतिहासिक महत्व असलेल्या शाळांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत

**(४४) * ३६८५५ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या व उत्कृष्ट शैक्षणिक कार्य करणाऱ्या राज्यातील निवडक १०० शाळांना प्रत्येकी रुपये १० लाख विशेष रोख पुरस्कार देण्याचा निर्णय सन २०१४ मध्ये तत्कालीन शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतांना सदर शाळांना निधी देण्याचा शासन निर्णय विद्यमान शासनाने दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केला असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विशेष रोख पुरस्कार प्राप्त या शाळांमध्ये कविवर्य कुसमाग्रज, कर्मवीर भाऊसाहेब पाटील, लोकमान्य टिळक व आगरकर विभूतींनी शिक्षण घेतलेल्या शाळांना रोख स्वरुपात पुरस्कार देण्याचे नाकारल्याने शासनाच्या या निर्णयाबाबत सामान्य जनतेमध्ये नाराजी निर्माण झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ऐतिहासिक महत्व असलेल्या या शाळांना रोख पुरस्कार देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय रद्द करावा व सदर शाळांना जाहिर केल्यानुसार आर्थिक सहाय्य देण्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी जाहिर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शाळांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या व उत्कृष्ट शैक्षणिक कार्य करणाऱ्या राज्यातील निवडक १०० शाळांना प्रत्येकी रुपये १० लाख विशेष रोख पुरस्कार देण्यासंदर्भात शासनाने दिनांक ३ मार्च, २०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला होता. तथापि, यासाठीचा निधी उपलब्ध नसल्यामुळे दिनांक ३ मार्च, २०१४ चा शासन निर्णय दिनांक ५ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील निकालांच्या गोंधळामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याबाबत

**(४५) * ३४९२७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.रविंद्र फाटक, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३८५ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाचे सर्व ४७७ परीक्षांचे निकाल जाहीर केले असले तरी सुमारे २८ हजार ४९८ विद्यार्थ्यांचे निकाल प्रलंबित असून सुमारे ४० हजार विद्यार्थी पुनर्मूल्यांकनाच्या निकालाच्या प्रतिक्षेत असून विधी शाखेच्या काही विद्यार्थ्यांचे निकाल अद्यापही जाहिर करण्यात आले नसून मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु संजय देशमुख यांच्या नियमबाह्य कारभाराचा परिणाम लाखो विद्यार्थ्यांवर झाल्यानंतरही 'विद्यापीठामार्फत विव्दत परिषद हा त्यांच्या अभिनंदनाचा ठराव आणण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा पध्दतीसाठी अवलंबिलेल्या ऑनलाईन असेसमेंटच्या कंत्राटात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठामध्ये अनागोंदी कारभार सुरु असून, टॉपर विद्यार्थ्यांना नापास करणे, निकालाची डेडलाईन चुकविणे, केवळ पुरवणीच तपासणे, उपस्थितांना अनुपस्थितीत दाखविणे, प्रमाणपत्र देण्यास विलंब लावणे, पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशाचा गोंधळ, निकालाआधीच पदव्युत्तर प्रवेश सुरु, विदेश शिक्षणाचा झालेला स्वप्नभंग, गुणपत्रिका तयार असून सहीसाठी होणारा विलंब, अर्धवट निकालांची नामुष्की इत्यादी अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांना झालेल्या त्रासाबद्दलच्या निषेधार्थ विद्यार्थी संघटनेने दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ रोजी विद्यापीठाच्या कलिना कॅम्पस येथे मुंडन केले तसेच कलिना कॅम्पसमधील परिक्षा भवनासमोर माहे ऑक्टोबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ऑनलाईन मुल्यांकनाच्या गोंधळात सुमारे २६०० उत्तरपत्रिका इतर विषयांच्या उत्तरपत्रिकांमध्ये मिसळल्यामुळे सुमारे १६०० उत्तरपत्रिका गहाळ झाल्या असून काही विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर शुन्य गुण छापून आले असून अशा चुकांमुळे शुन्य गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या नेमकी किती व त्यांचे गुण दुरुस्त करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली तसेच विदयार्थ्यांना सरासरी गुण देण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने या मूल्यांकनासाठी विद्यापीठ व मेरिट ट्रॅक या कंपनीत करारच झालेला नसून केवळ निविदा प्रक्रियेच्या आधारेच हे काम देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(५) तसेच, उत्तरपत्रिका गहाळ झाल्याने व गठ्ठे बदलल्याने विधी विभागाचे सर्वाधिक विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले असून जे विद्यार्थी एलएलएमची सीईटी उत्तीर्ण झाले त्यांचेही या गोंधळामुळे शैक्षणिक वर्ष वाया जावून नुकसान झाल्याने तसेच या ऑनलाईन असेसमेंटच्या कंत्राटाची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त निकाल विलंबाने लागल्यामुळे पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश, विदेशात उच्च शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या विदयार्थ्यांचे प्रवेश इतर अभ्यासक्रमांचे प्रवेश इत्यादी प्रवेशांवर व पुनर्मूल्यांकनाचे निकाल यावरही परिणाम झाला असल्याने याप्रकरणी मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा यांनी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठवून कार्यवाही करण्याबाबत विनंती केली आहे तसेच मुंबई विद्यापीठाच्या या संपूर्ण कारभाराची सखोल चौकशी करुन या प्रकारास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) प्रथम सत्र २०१७ च्या सर्व परिक्षांचे सर्व निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. मुंबई विद्यापीठाच्या विव्दत परिषदेत कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांच्या अभिनंदनाचा कुठलाही ठराव पारीत झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) ऑनलाईन मुल्यांकनाच्या प्रिक्रियेत काही विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिकांची सरमिसळ/गहाळ झाल्याने सदर विद्यार्थ्यांचे निकाल जाहिर करण्यात आले नव्हते अश्या विद्यार्थ्यांना सरासरी गुण देण्याचा निर्णय विद्यापीठाने दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ च्या परिक्षा व मुल्याकन मंडळाच्या बैठकीत घेतलेला असून एकूण ५०६५ विद्यार्थ्यांना सरासरी गुण देण्यात आले आहेत. मुंबई विद्यापीठ व मेरिट ट्रॅक कंपनी यांचेमध्ये सामंजस्य करार झालेला आहे.

(५) हे खरे नाही.

(६) हे अंशत: खरे आहे. तथापि, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या किंवा परदेशात उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या तसेच परदेशातील किंवा भारतातील इतर सरकारी किंवा खाजगी आस्थापनेत नोकरीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना सहाय्यता केंद्र (Help Desk) स्थापन केले होते. सदर सहाय्यता केंद्राच्या

माध्यमातुन अनेक विद्यार्थ्यांना गोपनिय निकाल (Confidential Result) व गुणपत्रक (Marksheet) देवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होणार नाही याची विद्यापीठातर्फे विशेष दक्षता घेण्यात आलेली आहे. तसेच मुंबई विद्यापीठाच्या या संपूर्ण कारभाराची सखोल चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## सन २०१२ नंतर नेमणूक झालेल्या शिक्षकांना नियमित करण्याबाबत

**(४६) * ३५८४२ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २८५१९ दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२ नंतर नेमणूक झालेल्या शिक्षकांना मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या संरक्षणाबाबत मुंबई शिक्षण उपसंचालकांकडून पूर्ण अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिक्षकांसह पायाभूत आणि विनाअनुदानित पदांना शासनाने विनाअट मान्यता द्यावी, यासाठी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार संबंधित शिक्षकांचे वेतन पूर्ववत करुन संबंधित निष्कासित शिक्षक/परिविक्षाधीन शिक्षकांना त्वरीत नियमित करण्याबाबत तसेच व्यक्तिगत मान्यता देण्याबाबत उपसंचालकांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यात अनुदानास पात्र म्हणून घोषित केलेल्या उच्च माध्यमिक शाळांच्या वर्ग व तुकड्यांना अनुदान देण्याबाबत

**(४७) * ३५५३९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३३४८८ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६ उच्च माध्यमिक शाळेतील १२ तुकड्या १०० टक्के अनुदानास पात्र व एका शाळेतील २ तुकड्या ४० टक्के अनुदानास पात्र असल्याचे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ च्या शासन आदेशाने घोषित केले असून शासन निर्णय, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ अन्वये कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये व वर्ग/तुकडया यांचा “कायम” शब्द हा वगळण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ४० टक्केच कनिष्ठ महाविद्यालये १०० टक्के अनुदानावर असून उच्च माध्यमिक शाळेतील वर्ग व तुकडयांना अजुनही कोणतेही अनुदान दिले नसल्याने सदर शाळेतील वर्ग व तुकडया अनुदानास पात्र म्हणून घोषित करून तसेच कायम विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देणेबाबत सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील कायम विनाअनुदानित मूल्यांकनास पात्र उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाची यादी लवकरच जाहीर करुन माध्यमिक प्रमाणे अनुदानाची प्रक्रिया करण्यात येईल, असा निर्णय मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत घेतला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक मागील १७ वर्षापासून विनावेतन काम करीत असून लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी व त्यापूर्वीही अनेकवेळा निवेदने पाठवून उच्च माध्यमिक विद्यालयाच्या व कनिष्ठ महाविद्यालयाच्या अनुदान पात्र यादया घोषित करून १०० टक्के अनुदान मंजूर करुन निधीची तरदतूद करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुदानास पात्र म्हणून घोषित केलेल्या किती उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये व वर्ग/तुकड्या यांना अनुदान उपलब्ध करून दिले आहे, तसेच उच्च माध्यमिक शाळामधील वर्ग व तुकड्यांना अनुदान देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(३) कायम विनाअनुदान तत्वावरील कनिष्ठ महाविद्यालयाच्या मूल्यांकनाच्या प्रस्तावात कनिष्ठ महाविद्यालयांच्या नावासोबत शिक्षकांची नावे असावी असा निर्णय दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ च्या बैठकीत घेण्यात आला आहे.

(४) उच्च माध्यमिक विद्यालयांच्या अनुदान पात्र यादया घोषित करुन अनुदान मंजूरीबाबत मा.लोकप्रतिनिधींनी मागणी केली हे खरे आहे.

(५) आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पदवीधारक शिक्षकांना निवडश्रेणी मिळण्याबाबत

**(४८) * ३५२३२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधारक शिक्षकांना २४ वर्षांनंतर मिळणारी निवडश्रेणी सरसकट सर्वच पदवीधर शिक्षकांना देण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) काही अटी व शर्तीच्या आधारे निवडश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने दिनांक २३/१०/२०१७ रोजी निर्णय घेतला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शारिरीक शिक्षकांना सुधारीत वेतनश्रेणी देण्याबाबत

**(४९) * ३५३०५ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शारिरीक शिक्षकांच्या सुधारीत वेतनश्रेणीचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाकडे मागील तीन महिन्यापासून प्रलंबित असल्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री महोदयांना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

राज्यातील शारिरीक शिक्षकांच्या सुधारीत वेतनश्रेणीचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

परंतू शारिरीक शिक्षकांना निवडश्रेणी लागू करताना एमपीएड. ची अट रद्द करण्याबाबतचे लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) निवदेनाच्या अनुषंगाने शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचे अभिप्राय मागितले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) शहरामध्ये अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी व विद्यार्थिनींकरीता वसतिगृह बांधण्याबाबत

**(५०) * ३४८४१ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक २६९१५ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) शहरामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी व विद्यार्थिनींकरीता वसतिगृह बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार नाशिक जिल्हा प्रशासनाने तालुकास्तरावरुन माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रस्ताव मागविलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येवला येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी व विद्यार्थीनीकरीता वसतिगृह बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२), (३) व (४) ज्या ठिकाणी वसतिगृह बांधावयाचे आहे, त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या उच्चशिक्षणाच्या सुविधा, जवळपासच्या शैक्षणिक संस्था, मागणी व त्या परिसरातील अल्पसंख्यांकांची लोकसंख्या इत्यादी बाबी विचारात घेऊन नाशिक जिल्हयात जागेचा शोध घेण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील रास्त भाव दुकाने बंद करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(५१) * ३५१५९ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सणांचा हंगाम जवळ आला असताना राज्यातील २२ जिल्हयातील ४९ हजार रास्तभाव दुकाने बंद करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रास्तभाव दुकान बंद झाल्यानंतर राज्यातील जनतेला सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत मिळणारे धान्य व इतर वस्तू उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांचे वेतन तांत्रिक कारणांमुळे थकीत राहिल्याबाबत

**(५२) * ३५२६५ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणेसह राज्यातील बहुतांश शिक्षकांचे माहे जुलै, २०१७ पासूनचे वेतन तांत्रिक कारणांमुळे थकीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार तांत्रिक कारणांमुळे थकीत राहिलेले शिक्षकांचे वेतन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कायम विनाअनुदान धोरणापूर्वीच्या महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत

**(५३) * ३४८५५ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च शिक्षण संचालक कार्यालय, पुणे येथे कृती समितीच्यावतीने राज्यातील कायम विनाअनुदान धोरणापूर्वी मान्यता दिलेल्या ५३ वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदान द्यावे यासाठी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान उपोषण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) वित्त विभागासमवेत बैठक आयोजित करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील शासकीय कला महाविद्यालयातील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५४) * ३५३७६ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३२१५८ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शासकीय कला महाविद्यालयात मंजुर असलेल्या २५ पदांपैकी रिक्त असलेली २३ पदे भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(२) तसेच, तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर शिक्षक नेमले जात असून त्यांच्याकडुन विदयार्थ्यांना शैक्षणिक फायदा होत नसल्याने विद्यार्थ्यांनी माहे ऑक्टोबर, २०११ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय कला महाविद्यालयात शिक्षक व आवश्यक सोई सुविधा नसल्याने ३०० विद्यार्थ्यांनी महाविद्यालय सोडण्यासाठी प्राचार्यांना विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार शिक्षकांची रिक्त पदे भरुन विद्यार्थ्यांना सोई सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद येथील अध्यापकांच्या रिक्त जागांवर २ अधिव्याख्याता नियमित स्वरुपात, न्यायालयीन आदेशान्वये १ अधिव्याख्याता हंगामी स्वरुपात व ५ अधिव्याख्याता कंत्राटी स्वरुपात अशी एकूण ८ पदे कार्यरत असून १८ जागा रिक्त आहेत. सदर रिक्त असलेल्या १८ जागांपैकी १३ जागांवर अभ्यागत अधिव्याख्याता तासिका तत्वावर नेमण्यात आले आहेत. नियमित, हंगामी व कंत्राटी अधिव्याख्याता असे एकूण ८ अधिव्याख्याता पुर्णवेळ व १३ अधिव्याख्याता तासिका तत्वावर असे एकूण २१ अधिव्याख्याता कार्यरत आहेत. रिक्त पदांवर नियमित स्वरुपात अध्यापक भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.
(२) नाही. तासिका तत्वावरील अध्यापकांमुळे विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होत नाही. विद्यार्थ्यांनी ऑक्टोबर, २०११ मध्ये आंदोलन केलेले नसून माहे ऑक्टोबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यामध्ये केले होते.
(३) सद्य:स्थितीत आवश्यकतेप्रमाणे शैक्षणिक साहित्य उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत नाही. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये औरंगाबाद येथील शासकीय कला महाविद्यालयासाठी रुपये ११,११,४००/- इतक्या रकमेच्या यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. महाविद्यालय सोडण्याबाबत ३०० विद्यार्थ्यांनी अर्ज दिलेले नसून केवळ उपयोजित कला विभागातील ९२ विद्यार्थ्यांनी महाविद्यालय सोडण्याबाबत अर्ज दिलेले होते. मात्र त्यांनी नंतर स्वत:हून अर्ज मागे घेतले होते.

(४) नियमित स्वरुपात जागा भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यात वायू प्रदूषण झाल्याबाबत

**(५५) * ३५५४१ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) तालुक्यात एनएमडी, ओएनजीसी, भारत गॅस, विद्युत प्रकल्प, जेएनपीटी बंदर, जीटीआय, सिंगापूर पोर्ट, जेएनपीटी सेझ प्रकल्प व एमएमआरडीए सारखे महत्वाचे प्रकल्प निर्माण होत असल्याने देशातील सर्वात जलद विकसित होणारे शहर म्हणून उरणची ओळख होऊ लागली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरातील नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट होत असून नाल्याचे गटारात रुपांतर झाल्याने हवेतील प्रदूषणाबरोबर धुळीकणांचे प्रमाण वाढल्याने अनेक नागरिकांना हृदयविकाराचा त्रास होऊ लागला असून सन २०१६ या वर्षापासून सुमारे २८ नागरिक हे हृदयविकाराच्या त्रासाने मृत्यू पावले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उरण तालुक्यातील नागरिकांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येथील प्रशासन विभाग, सिडको अकार्यक्षम ठरले असून पर्यावरणाकडे शासनाचे व महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उरण तालुक्यातील वायू प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) तहसिलदार, उरण यांनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी सर्व संबंधित शासकिय विभागांची बैठक घेऊन उरण तालुक्यातील हवेतील प्रदूषण कमी करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणेबाबत सर्व संबंधितांना निर्देश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शाळांना शालेय पोषण आहार साठविण्यासाठी धान्याची कोठारे उपलब्ध करून देण्याबाबत

**(५६) * ३५६३० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित व अनुदानास पात्र ठरलेल्या शाळा यामधील मुलांना व मुलींना शासनामार्फत मोफत शालेय पोषण आहार दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांना शालेय पोषण आहारापोटी दिले जात असलेले धान्य साठविण्यासाठी शाळेत कोणतेही साहित्य नसल्याने सदर धान्याची उपद्रवी जीवाकडून नासधूस होत असून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना धान्य साठविण्यासाठी धान्याची मोफत कोठारे शासनाकडून देण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धान्याची कोठारे खाजगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना मिळण्यासाठी शाळांकडून व शिक्षक संघटनाकडून मागणी केली जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांना मोफत शालेय पोषण आहार साठविण्यासाठी धान्याची कोठारे उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन २०१५-१६ मध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र शाळांना धान्य साठविण्यासाठी कोठया किंवा भांडी पुरविण्यासाठी शाळास्तरावर निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच, सन २०१७-१८ मध्ये पोषण आहार योजनेंतर्गत पात्र शाळांना धान्य साठविण्यासाठी कोठया खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आडगांव (जि.नाशिक) येथील नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या संपादित जागेवरील बांधकामाबाबत

**(५७) * ३५२०३ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २६९६४ ला दिनांक २५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगांव (जि.नाशिक) येथील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या संपादित जागेवरील प्रशासकीय इमारत बांधकामाची ई-निविदा अंतिम करण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारतीच्या बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, सदरील कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे तसेच बांधकाम सुरु करण्यात होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) निविदा प्रक्रियेद्वारे निवड केलेल्या कंत्राटदारास इमारत बांधकाम कार्यादेश देण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्यात आहे.

-----------------

## राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षकांना नियमबाहय पध्दतीने मान्यता दिल्याबाबत

**(५८) * ३५८९४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळांमधील ४ हजार ११ शिक्षकांना नियमबाहय पध्दतीने मान्यता दिली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यात दोषी आढळलेल्या अधिकारी व संचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे

जुलै, २०१७ चे दरम्यान निदर्शनास आले.

(२) कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हाफकिन केंद्र (जळगांव) मागील दिड वर्षापासून बंद असल्याबाबत

**(५९) * ३४९५९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाफकिन (जळगाव) येथील युनिटमध्ये सर्दी-खोकला, पोलिओ, सर्व विंचु, श्वानदंश, घटसर्प, धनुर्वात, गँग्रीन यावर लस इंजेक्शन गोळया यासह सर्व जेनेरिक औषधे अशी सर्व प्रकारची औषधे बनविण्याची संपूर्ण यंत्रणा असताना तसेच या युनिटला शासकीय ऑर्डर असताना व्यवस्थापकीय संचालक मंडळाकडून हाफकिन मंडळ बंद केल्याने स्वस्तातील औषधांचा पुरवठा होत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाब हाफकिनच्या कर्मचारी संघाने मा.पालकमंत्री तसेच मा.वैद्‌यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्री यांच्याही निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हाफकिनचे जळगाव युनिट बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त युनिट सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हाफकिन महामंडळाची सहयोगी कंपनी असलेल्या हाफकिन अजिंठा फार्मा लि. जळगाव युनिटमध्ये केवळ क्षार संजीवनी, प्रतिजैवके, ज्वरनाशकाची औषधे, मानसोपचार औषधे, क्षयरोग औषधे, पोटदूखी व ॲलर्जीवरील औषधे यांचे उत्पादन करण्यात येते. सदर युनिटमध्ये

पोलिओ, विंचु, श्वानदंश, घटसर्प, धनुर्वात, गॅंग्रीन इत्यादीवर कुठलीही लस अथवा इंजेक्शन यांचे उत्पादन घेण्यात येत नाही. हाफकिन व्यवस्थापकीय संचालक मंडळाकडून हाफकिनचे जळगाव येथील युनिट बंद करण्याबाबत कोणतेही निर्देश देण्यात आलेले नाहीत.

(२) होय.

(३) हाफकिनचे जळगाव येथील युनिट बंद करण्यात आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हयात शिक्षक भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६०) * ३४६७३ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील शिक्षण विभागात सन २०१०-११ ते २०१२-१३ या कालावधीत शिक्षक भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार विभागीय उपसंचालक, शिक्षण संचालनालय, औरंगाबाद यांच्याकडे सन २०१२ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारीनंतर गठित केलेल्या चौकशी समितीने चौकशी करून आपला अहवाल दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदरहू अहवालात ९९ खाजगी शाळांमध्ये २६२ बोगस तुकडया, ३६९ शिक्षकांची बेकायदा भरती करुन शिक्षकांच्या वेतनासाठी ६ कोटी ९८ लाख ९७ हजार ९९० रुपयांचा गैरव्यवहार केल्या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाणे लातूर येथील संबंधित अधिकारी, संस्था चालक व मुख्याध्यापक यांच्याविरुध्द माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार सदरहू प्रकरणी दोषी असलेल्या संबंधित अधिकारी, शिक्षण संस्था चालक व मुख्याध्यापक यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई सुरु आहे. तसेच संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल झाले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना पूर्ववत साखर वितरण करण्याबाबत

**(६१) * ३५४६७ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने अनुदान बंद केल्यामुळे शासनाने दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) व अंत्योदय योजनेतील कुटूंबाना रास्तभाव दुकानातून वितरीत करण्यात येणाऱ्या साखरेबाबत निर्णय घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने रास्तभाव दुकानातून दारिद्रय रेषेखालील ४५ लाख कुटुंबाना साखर वितरीत करण्यात येणार नसून फक्त अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना साखर वितरीत करण्यात येणार असून साखरेच्या दरात पाच रुपयांनी वाढ करण्यात येवून अंत्योदयच्या प्रती कुटुंबास महिन्याला फक्त एक किलो साखर देण्यात येणार असल्याचा निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच रायगड जिल्ह्यात व राज्यातील अन्य १३ जिल्ह्यात अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिवांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी काढलेल्या अंत्योदय कुटुंबांतील कमी किंवा दोनच सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबांची अंत्योदय शिधापत्रिका रद्द करून त्यांना प्राधान्य गटातील कार्ड देण्याबाबत काढलेल्या आदेशाच्या निषेधार्थ दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निर्णयामुळे दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) सुमारे ४५ लाख कुटुंबांना साखर मिळणार नसून अंत्योदय योजनेत सुधारणा केल्यामुळे यातील लाभार्थ्यांवरही त्याचा परिणाम होणार असल्याने माहे सप्टेंबर, २०१७ व ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान राज्यात ठिकठिकाणी आंदोलने व निदर्शने करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप व कारणे काय आहेत, तसेच ऐन दिवाळीच्या दरम्यान शिधापत्रिकेवर साखर देण्याचे बंद करण्यात आल्याने खुल्या बाजारात साखरेचे भाव ४० ते ४५ रुपये प्रतिकिलो असल्याने गरीब कुटुंबांना या दराने साखर खरेदी करणे परवडत नसल्याने ऐन सणासुदीच्या काळात सर्वसामान्य जनतेला साखरेपासून वंचित ठेवण्यात आले असून शिधापत्रिकेवर डाळ, तेल, आटा व इतर वस्तुंचा पुरवठाही करण्यात आला नसल्याने जीवनावश्यक वस्तु पासून वंचित रहावे लागले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त निर्णयाचा फेरविचार करुन राज्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना पूर्ववत साखर वितरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या १२ मे, २०१७ च्या आदेशान्वये व त्या अनुषंगाने दिनांक १ जून, २०१७ च्या आदेशान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांनाच प्रती कुटुंब प्रतिमाह १ किलो याप्रमाणे साखर वाटप करण्याचा निर्णय राज्य शासनाने दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतलेला आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे,

अन्न अधिकार आंदोलन, महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयावर मोर्चा काढून दिनांक १२/१०/२०१७ रोजी व अध्यक्ष, श्रमजीवी कामगार संघटना यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांना दिनांक २८/०९/२०१७ रोजी निवेदन दिले आहे.

या निवेदनांच्या अनुषंगाने अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिका वर्ग करण्याबाबत आणि शासनाने दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करण्याबाबत सदरहू जिल्हयातील जिल्हा पुरवठा अधिकारी यांना दिनांक २०/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) केंद्र शासनाच्या १२ मे, २०१७ च्या आदेशान्वये व त्या अनुषंगाने दिनांक १ जुन, २०१७ च्या आदेशान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शासनाने अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांनाच प्रती कुटुंब प्रतिमाह १ किलो याप्रमाणे साखर वाटप करण्याचा निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतलेला आहे.

ऐन दिवाळीच्या दरम्यान अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांनाच उपरोक्त शासन निर्णयानुसार साखरेचे वाटप करण्यात आलेले आहे. लक्ष निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत डाळ, तेल, आटा वितरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन नाही.

(५) राज्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना (बीपीएल) पूर्ववत साखर वितरण करण्याबाबत राज्य शासनाने दिनांक ०७ ऑगस्ट, २०१७ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे विनंती केलेली आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी पाठपुरावा करण्याबाबत राज्यातील संसद सदस्यांना दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील रात्रशाळेतील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्याबाबत

**(६२) * ३६००२ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील शेकडो शिक्षकांना दरवर्षी आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात येत असून त्यात प्राथमिक शिक्षक, आदिवासी, कला व क्रीडा शाळांमधील शिक्षकांचा समावेश असतो, परंतू रात्रशाळेतील शिक्षकांचा समावेश नसतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रात्रशाळेतील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात यावे अशी मागणी शिक्षक परिषदेने मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रात्रशाळेतील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शिक्षकांना राष्ट्रीय पुरस्कार हे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार देण्यात येतात त्यानुसार शिक्षकांना १५ वर्षाचा व मुख्याध्यापकांना २० वर्षाचा नियमित अध्यापन अनिवार्य आहे. रात्रशाळेतील शिक्षक हे अर्धवेळ शिक्षक असल्याने व अर्धवेळ शिक्षकांना सेवा संरक्षण नसल्याने रात्रशाळेतील शिक्षकांना राज्य शिक्षक पुरस्कार देता येत नाहीत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रथम वर्ष बीएच्या पुस्तकातून पुत्रप्राप्तीची शिकवण दिल्याबाबत

**(६३) * ३५३८६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३१२१८ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रथम वर्ष बीएच्या पुस्तकातून पुत्रप्राप्तीची शिकवण दिली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच पुस्तकात चातुर्वर्ण्यव्यवस्था व जातीव्यवस्थेचे समर्थन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यापीठाच्या अभ्यास मंडळासमोर ठेवण्यात आलेला वादग्रस्त विषय अभ्यासक्रमातून वगळण्याबाबत कार्यवाही करून, सदर विषयाला अभ्यासक्रमात मान्यता देणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## के.जे.सोमय्या महाविद्यालय (मुंबई) येथे मराठी प्राध्यापकाचे पद रद्द केल्याबाबत

**(६४) * ३५८०५ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) के.जे.सोमय्या कनिष्ठ महाविद्यालय (मुंबई) येथे मराठी भाषा हद्दपार करण्याच्या हेतूने सुधारित संच मान्यता असूनही मराठी विभागातील दोन प्राध्यापकांच्या पदापैकी एक पद रद्द करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ मध्ये सदर महाविद्यालयाने विदेशी भाषांना परवानगी नसतानाही फ्रेंच, जर्मनी, जपान, आदि भाषांसाठी विद्यार्थांना प्रवेश दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठी भाषा हद्दपार करणाऱ्या उक्त महाविद्यालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केसरी शिधापत्रिका धारकांना १०० टक्के धान्याचा पुरवठा करण्याबाबत

**(६५) * ३४९८३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने शासनाच्या दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या परिपत्रकानुसार दारिद्रय रेषेखालील केसरी कार्डधारकांमधील उत्पन्नाच्या निकषाच्या आधारे प्राधान्य लाभार्थ्यांची यादी

अंतिम करुन सर्व लाभार्थ्यांना १०० टक्के धान्याचा पुरवठा करण्याबाबतची मागणी स्थानिक माजी लोकप्रतिनिधी श्री.विवेक पंडित यांनी मा.मुख्यमंत्री, मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री, प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभाग व जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दारिद्रय रेषेखालील केसरी शिधापत्रिका धारकांना १०० टक्के धान्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.
(२) जास्तीत जास्त एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांचा योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. उर्वरित लाभार्थ्यांना समाविष्ट करुन घेण्याबाबत दिनांक १५ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मराठी शाळांचा शिक्षणाचा दर्जा वाढविण्याबाबत

**(६६) * ३५६५० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ३२२३५ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या ग्रामीण भागातील जिल्हा मराठी प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पहिली ते सातवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची पट संख्या दिवसेंदिवस कमी होत असणे, शिक्षण विभाग मराठी प्राथमिक शाळा बंद करीत असून मुंबईतील मराठी शाळांचे वर्ग कमी होऊन मराठी शाळांमध्ये फक्त ४७ हजार विद्यार्थी शिकत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेल्या शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असल्याने सदर खर्च केलेला निधी वापरात येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिका प्राथमिक विभागाच्या तसेच राज्यातील मराठी शाळांची संख्या कमी होत असल्यामुळे २४ टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उर्दू, हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या विद्यार्थी पट संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून मराठी शाळांची पटसंख्या कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील महापालिका व इतर ग्रामीण भागातील मराठी शाळांच्या शिक्षणाचा दर्जा वाढविण्याकरिता तसेच मराठी भाषेचे संवर्धन व मराठी शाळांमधील विदयार्थ्यांचा टक्का वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) नाही.

(५) राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्यादृष्टीने व विद्यार्थ्यांची गळती कमी करण्याच्यासाठी विहीत कार्यक्रम विभागामार्फत राबविण्यात येत आहे. त्यातील प्रमुख योजना खालीलप्रमाणे :-

अ) सन २०१०-११ पासून इयत्ता १ ली ते ८ वी च्या स्तरावर सर्वंकष मूल्यमापन पध्दती सुरु करण्यात आली.

ब) शैक्षणिक गुणवत्ता कक्षाची स्थापना.

क) राज्यस्तरीय अध्यायन संपादणूक सर्वांकष कार्यक्रम.

ड) गुणवत्तावाढ व गळती कमी करण्यास उद्दिष्टांक ठरविणे.

इ) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची अंमलबजावणी.

ई) राज्यातील बालकांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा घडून आणणे.

उ) नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत शाळांच्या गुणवत्तावाढीबाबत प्रयत्न.

वरील उपक्रमानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांतील प्रत्येक मुलांस गुणवत्तापूर्वक प्राथमिक शिक्षण नाविण्यपूर्ण उपक्रमांच्या मार्फत तसेच शाळेची मानके व मूल्यमापनाकरिता सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याचा अधिकार शिक्षण हक्क कायद्याने मिळाला असल्याने समृध्द शाळा निर्मितीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोहा (जि.नांदेड) तालुक्यात स्वस्त धान्याचा काळाबाजार झाल्याबाबत

**(६७) * ३५५७८ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यात काही स्वस्त धान्य दुकानदारांना एकाच महिन्यात दोन-दोन वेळा धान्य देण्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे १३ हजार ५०० क्विंटल धान्य अधिकाऱ्यांच्या संगनमताने काळया बाजारात विकण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वस्त धान्याच्या काळयाबाजाराची विशेष पथकामार्फत चौकशी करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

मात्र, डिसेंबर, २०१५ ते एप्रिल, २०१६ या कालावधीत तहसिल, लोहा कार्यालयातील पुरवठा विभागाच्या अभिलेख्यांची तपासणी केली असता लोहा तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांनी नियतनापेक्षा जास्त धान्य व साखर उचल केल्याचे निदर्शनास आल्यामुळे एकूण रुपये ८२,९६,७११.३६/- इतक्या रकमेचे वसुली आदेश जिल्हाधिकारी, नांदेड यांनी त्यांच्या दिनांक १६/०१/२०१७ आदेशान्वये दिले. त्यानुसार संपूर्ण रक्कमेची वसुली करण्यात आली आहे.

या प्रकरणी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेविरुध्द संयुक्त विभागीय चौकशी करणेचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांनी दिनांक ०५/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेला आहे.

-----------------

## गोसे धरणातील जलसाठा दूषित झाल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(६८) * ३५९०४ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील विविध केमिकल्स कंपन्यांचे वेस्टेज तसेच रासायनिक पाणी नाग नदीतून वाहत जाऊन वैनगंगेच्या पाण्यात जमा होत असल्याने गोसे धरणातील संपूर्ण जलसाठा दूषित झाला असून त्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरीकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तसेच संबधितांकडे अनेक वेळा तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोसे धरणातील दूषित जलसाठयाबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) मा.श्री.सुधीर पारवे, विधान सभा सदस्य यांचे तक्रारीस दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी स्थळ पाहणी केली असता तक्रारीत नमुद असलेल्या उदयोगांमधून कोणत्याही प्रकारचे औदयोगिक अथवा नागरी सांडपाणी नाल्याव्दारे नागनदीत सोडले अथवा वाहत जात असल्याचे निदर्शनास आले नाही.

माननीय विधान सभा सदस्य श्री.रामचंद्रजी अवसरे यांचेकडून दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१६ रोजी नागनदी पर्यायाने गोसे धरणाच्या प्रदुषणाबाबत तक्रार प्राप्त झालेली होती. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नागनदीच्या प्रदूषणास कारणीभूत असलेल्या नागपूर महानगरपालिकेविरुध्द जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत कारवाई केलेली आहे.

तसेच, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी मा.विधान परिषद सदस्य श्री.परिणय फुके, जिल्हाधिकारी, भंडारा, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मे. एन.टि.पी.सी. मौदा, निरी नागपूर व अध्यक्ष नगर परिषद भंडारा यांच्या समवेत बैठक संपन्न झाली असता नागपूर व ग्रामीण भागातील सांडपाणी नागनदीव्दारे गोसीखुर्द धरणामध्ये जात असल्यामुळे धरणातील पाणी खराब होत असल्याने सदर सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रक्रियाकृत पाण्याचा उपयोग एन.टी.पी.सी. प्रकल्पामध्ये करण्याकरिता मे.एन.टी.पी.सी. ने पाणी विकत घेण्यास तत्वत: सहमती दर्शवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सडकी सुपारी विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(६९) * ३५४८२ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः मुंबई व नागपूर विभागात मोठया प्रमाणात सडकी सुपारी विक्री होत असल्याचे दिनांक ६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सडकी सुपारी विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) नागपूर विभागात अशी बाब उघडकीस आली आहे. परंतू, मुंबई व राज्यात इतर ठिकाणी अशी बाब उघडकीस आलेली नाही.
(२) नागपूरात एकूण ४६ सुपारीचे नमुने घेण्यात आले. त्यापैकी १५ प्रमाणित, १३ कमी दर्जाचे, १२ असुरक्षित, ०२ मिथ्याछाप अहवाल प्राप्त झाले असून ४ अहवाल प्रलंबित आहेत. असुरक्षित नमुन्या प्रकरणी ०७ खटले दाखल करण्यात आले आहेत. कमी दर्जा आढळून आलेल्या प्रकरणात न्यायदंड होवून रुपये ८० हजार दंड वसूल करण्यात आला आहे व उर्वरीत प्रकरणी नियमानुसार खटले दाखल करण्याची कार्यवाही घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निळोणा, चापडोह, बेंबळा (जि.यवतमाळ) धरणात कमी पाणीसाठा असल्याबाबत

**(७०) * ३५०४१ श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयात माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंत ५० टक्के पाऊस पडल्यामुळे निळोणा, चापडोह, बेंबळा धरणात पाणीसाठा २९ टक्के पेक्षा कमी झाल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाला नियोजन करण्यास कळवूनही त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे नजिकच्या काळात पाण्याची टंचाई निर्माण होणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यवतमाळ जिल्हयातील पाणीटंचाई दूर करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) व (२) असा प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झाला नसल्याने त्याकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे, हे खरे नाही.

तथापि, निळोणा व चापडोह धरणातील अत्यल्प पाणी साठा विचारात घेऊन यवतमाळ शहरातील पाणी टंचाई निवारणार्थ आकस्मिक पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिनांक १३/११/२०१७ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे सादर केला होता. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी वैशिष्टयपूर्ण योजनेंतर्गत नगर विकास विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून रुपये १३२.९० लाख इतक्या किंमतीच्या योजनेस दिनांक ५/१२/२०१७ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच, यवतमाळ शहराकरिता केंद्र शासनाच्या अमृत योजनेंतर्गत बेंबळा धरण उध्दव धरुन पाणीपुरवठा योजना मंजूर असून त्या योजनेचे काम सुरु आहे.

त्याचप्रमाणे यवतमाळ जिल्हयातील पाणी टंचाई निवारणासाठी ६७० गावे/वाडया यांचा समावेश असलेला रुपये १०७९.६६ लाख किंमतीचा ९०३ उपाययोजनांचा संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात १० वी व १२ वीच्या परिक्षेसाठी काम केलेल्या शिक्षकांना मानधन देण्याबाबत

**(७१) * ३५५२७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळ, पुणे यांच्यावतीने माहे फेब्रुवारी व मार्च, २०१७ मध्ये घेतलेल्या १० वी व १२ वीच्या परिक्षेसाठी काम केलेल्या शिक्षकांना मानधन मिळाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांचे थकीत मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) परीक्षेसाठीचे मानधन शिक्षकांच्या खात्यावर वर्ग करण्यात येते. मार्च, २०१७ मध्ये झालेल्या परीक्षांसाठीचे मानधन माहे सप्टेंबर, २०१७ अखेरपर्यंत ऑनलाईन अथवा धनादेशाव्दारे शिक्षकांच्या खात्यावर वर्ग करण्यात आले आहे. तथापि, काही शिक्षकांनी सादर केलेल्या खात्याच्या तपशीलामध्ये तफावत आढळल्याने संबंधितांकडून अचूक माहिती प्राप्त करुन मानधन वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे. ज्या शिक्षकांचा बँकेचा तपशील प्राप्त झालेला नाही त्या शिक्षकांचे मानधन धनादेशाव्दारे संबंधित शाळांच्या पत्त्यावर पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले महिला बचत गट (जि.बीड) मार्फत चालविण्यात येणाऱ्या दुकानाचा परवाना रद्द करण्याबाबत

**(७२) * ३५३९१ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले महिला बचत गट (जि.बीड) यांच्यामार्फत चालविलेल्या रास्तभाव दुकानातून रास्तभावापेक्षा अधिक दराने धान्याची विक्री होत असल्याने तहसिलदारांनी दिलेल्या अहवालाच्या आधारे पुरवठा उपायुक्तांनी या दुकानांचा परवाना रद्द केला होता मात्र त्याकडे दुर्लक्ष करुन मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांनी पुन्हा या बचतगटाला रास्तभाव दुकानाचा परवाना दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्हयात निलंबनानंतरही स्वस्त धान्य दुकानात बनावट ओळखपत्र तयार करुन ३२ क्विंटल धान्य घेणाऱ्या सावित्रीबाई फुले महिला बचतगटाच्या नावाने पुन्हा परवाना देण्याच्या निर्णयावरुन मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना ताकिद दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील घटनेनुसार राज्यात अनेक गावखेडयात रास्तभाव दुकानांतून रास्तभावापेक्षा जास्त दराने धान्य विक्री होत असून काही वेळा धान्य नसल्याचेही सांगितले जात असल्याने त्याचा परिणाम सर्वसामान्य गरजू व्यक्तींवर होत असून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सावित्रीबाई फुले बचतगटावर तसेच राज्यातील इतर रास्त भाव दुकानांतून रास्तभावापेक्षा जास्त दराने धान्य विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) व (२) जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ अंतर्गत निर्गमित केलेल्या विविध सांविधानिक आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अर्धन्यायिक अधिकारांतर्गत सावित्रीबाई फुले महिला बचत गटाचा शासनस्तरावरील पुनर्रिक्षण अर्ज अंशत: मंजूर करण्यात आला होता. तथापि, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने सावित्रीबाई फुले महिला बचत गटाचे प्राधिकारपत्र पुर्ववत करण्याबाबतचे शासन आदेश रद्द केले आहेत.

(३) व (४) बीड जिल्ह्यामध्ये माहे जानेवारी, २०१७ ते ऑक्टोबर, २०१७ अखेर एकूण १९८७ रास्तभाव धान्य दुकानांच्या तपासण्या करण्यात आल्या असून, तपासणीअंती दोषी आढळून आलेल्या रास्तभाव धान्य दुकानांचे परवाने निलंबित तथा रद्द करण्यात आले आहेत. राज्यात देखील अशाच प्रकारची कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेरळ येथील अभियांत्रिकी महाविद्यालयावर कारवाई करण्याबाबत

**(७३) * ३६२४९ श्री.रविंद्र फाटक, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अभियांत्रिकी महाविद्यालयांना मान्यता घेताना ऑनलाईन माहिती तसेच प्रतिज्ञापत्रही सादर करावे लागत असतांना नेरळ येथील दिलकॅप अभियांत्रिकी महाविद्यालयाने एआयसीटीई, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई विद्यापीठ आणि शुल्क नियंत्रण प्राधिकरणाला माहिती सादर करतांना ४० बोगस शिक्षक दाखवून तंत्र शिक्षणावर नियंत्रण ठेवणाऱ्या संस्थाची फसवणूक केल्याबाबतची तक्रार सीटीझन फोरम स्वयंसेवी संस्थेने तंत्र शिक्षण सचिवाकडे प्रत्यक्ष भेट घेवून माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महाविद्यालयाने एकाही कर्मचाऱ्याचा प्रॉव्हिडंट फंड भरला नसून अनेकांचे खातेही उघडले नाही, तसेच पेपर तपासणीचे मानधनही कोणाला देण्यात आलेले नाही अशा अनेक तकारी प्राप्त झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) याबाबत सिटीझन फोरम फॉर सॅन्क्टीटी इन एज्युकेशनल सिस्टीम या संघटनेने केलेली तक्रार संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मुंबई विद्यापीठ, मुंबई व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्यात आली आहे.

या प्रकरणी संचालक, तंत्र शिक्षण, शुल्क नियामक प्राधिकरण व मुंबई विद्यापीठ यांच्याकडून चौकशी सुरु आहे.

या प्रकरणी विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्याकडून चौकशी अहवाल संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्याकडे प्राप्त झाला असून संचालक, तंत्र शिक्षण यांच्यास्तरावर चौकशी अहवालाची छाननी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोरेगाव (जि.गोंदिया) येथे धान खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७४) * ३५३०४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव (जि.गोंदिया) येथील नेहरु सेवा सहकारी सोसायटी व पूर्ती शेती उद्योग साधन सामग्री पुरवठा खरेदी विक्री सोसायटी यांनी कागदोपत्री धान खरेदी केल्याचे दाखवून करोडो रुपयांचा गैरव्यवहार केला असून याबाबत धान विक्री शेतकऱ्यांनी (अडत्यांनी) संबंधित जिल्हाधिकारी, डी.सी. सप्लाय ऑफिसर नागपूर व विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे लेखी तक्रार केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार धान खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय, याबाबत ईमेलव्दारे तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) सदर प्रकरणी मार्केटिंग फेडरेशन मार्फत स्वंतत्रपणे चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालात खरेदीमध्ये अनियमितता आढळून आली नाही, परंतु प्रत्यक्ष खरेदी करण्यात आलेला धान व गिरणीमालकांना देण्यात आलेला धान यामध्ये घट आल्यामुळे घटीची रक्कम मार्केटिंग फेडरेशनकडून मंजूर घट वजा जाता, सदर संस्थेला देय असलेल्या प्रशासकीय खर्चातून वसूल करण्यात आली आहे. तसेच, जिल्हा मार्केटिंग अधिकारी, गोंदिया यांनी सदर संस्थेकडून रब्बी हंगाम २०१६-१७ चे धान खरेदीचे काम दिनांक १४/०४/२०१७ च्या आदेशान्वये काढून घेतले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी पाड्यातील अप्रशिक्षित शिक्षकांवर होत असलेल्या अन्यायाबाबत

**(७५) * ३६८६८ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुर्गम भागातील व आदिवासी पाड्यातील मुलांची प्राथमिक शिक्षणाची सोय व्हावी याकरिता सन २००० पासून वस्तीशाळा सुरु करण्यात आल्या असून या वस्तीशाळांमध्ये ज्या ठिकाणी प्रशिक्षित उमेदवार मिळाले नाहीत, त्या ठिकाणी अप्रशिक्षित १२ वी पास उमेदवारांची नेमणूक वस्तीशाळा स्वयंसेवक म्हणून करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ मध्ये या सर्व वस्तीशाळा बंद करुन त्यातील स्वयंसेवकांचा जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक म्हणून समावेश करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिकांचे शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक, सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, समाजकल्याण आयुक्त, आदिवासी विकास आयुक्त व अपंग कल्याण आयुक्त यांना पत्र पाठवून, त्यांच्या अधिनस्थ असलेल्या सर्व शाळांमधील अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांनी दिनांक ३१ मार्च, २०१९ अखेर प्रशिक्षण म्हणजेच (डीएड) पदविका प्राप्त करणे आवश्यक असून, प्रशिक्षण पूर्ण न करणाऱ्या शिक्षकांची सेवा समाप्त करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निर्णयामुळे राज्यातील १५-१६ वर्षे नोकरी केलेल्या सुमारे ९००० शिक्षकांवर उपासमारीची वेळ येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अप्रशिक्षित शिक्षकांवर होत असलेल्या अन्यायाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.

दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात गुटखा विक्रीवर प्रतिबंध करण्याबाबत

**(७६) * ३४९५१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा व तत्सम अन्न पदार्थावर प्रतिबंध घालण्यात आला असतांनाही दिवसेंदिवस प्रतिबंधित अन्न पदार्थाची विक्री कमी होण्याऐवजी वाढत असून शासनामार्फत सन २०१२ मध्ये गुटखा उत्पादन आणि विक्रीवर प्रतिबंध घालण्यात आले असून मुंबईसह राज्यात गुटखा सहजरित्या उपलब्ध होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी गुटखा तस्करांशी आर्थिक संबंध असणारे काही अधिकारी जबाबदार असल्यामुळे गुटखा तस्करांना संरक्षण देणाऱ्या व त्यांच्याशी संबंध असणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची सी.आय.डी.मार्फत चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात मा.अन्न व औषध प्रशासन मंत्री यांना पत्र दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील सांताक्रुझ येथील एस.व्ही. रोडवरच्या रिझवी पार्क सोसायटीतील दोन गाळ्यांमध्ये गुटख्याचा साठा सापडला असून गुटख्याच्या काळाबाजाराचे रॅकेट संपूर्ण राज्यात पसरलेले असून अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने राज्यात अवैधरित्या विक्री होणाऱ्या गुटख्याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यात गुटखा विक्रीवर प्रतिबंध घालण्याबाबत कार्यवाही करुन या प्रकरणातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) अशी बाब निर्देशनास आलेली नाही.
(२) होय.
(३) दिनांक ०३/१०/२०१७ रोजी रीझवी पार्क सांताक्रुज येथे गुटख्याचा साठा सापडला हे खरे आहे. मात्र अन्न व औषध प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. ही बाब खरी नाही.
(४) सदर प्रकरणी रुपये २८,८७,१५०/- इतक्या किमतीचा साठा प्रतिबंधित केला असून त्याचे नमुने विश्लेषणासाठी अन्न चाचणी प्रयोगशाळा मुंबई यांचेकडे पाठविण्यात आले आहेत. तपास चौकशी पुर्ण होताच खटला दाखल करण्याची कार्यवाही प्रशासनाकडून करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील माहिती व तंत्रज्ञान शिक्षकांना वेतन देण्याबाबत

**(७७) * ३५८४८ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील माहिती व तंत्रज्ञान विषयावरील नियुक्तीस मान्यता मिळालेल्या शिक्षकांची मान्यता शिक्षण संचालकाकडून प्राप्त झाल्यानंतर त्यांना वेतन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहिती व तंत्रज्ञान शिक्षकांची मान्यता शिक्षण संचालकांकडून प्राप्त झाली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांना वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील बी.एड.धारक शिक्षकांना पदवीधर शिक्षक पदाची वेतनश्रेणी देण्याबाबत

**(७८) * ३५४६० श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील सन २००० व २००१ मध्ये डावललेल्या बी.एड. धारक शिक्षकांना मानीव दिनांकापासून पदवीधर शिक्षक पदाची वेतनश्रेणी देण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्यामार्फत उपायुक्त, नागपूर विभाग यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांना दिनांक २७/७/२०१६, १५/१०/२०१६ व २९/११/२०१६ ला पत्र पाठवून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाची तसेच लोकप्रतिनिधींनी दिलेल्या पत्राची १ वर्षापासून दखल न घेतल्याने नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक २८/०३/२०१६ व १६/०९/२०१७ रोजी पत्र पाठवून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्याविरुध्द कारवाई करण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बी.एड.धारक शिक्षकांना पदवीधर शिक्षक पदाची वेतनश्रेणी देण्याबाबत तसेच संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना ग्रामविकास विभागाच्या दिनांक २२/११/२०१७ च्या पत्रान्वये अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील शिक्षक व कर्मचाऱ्यांची आयकर कपात रक्कम जमा करण्याबाबत

**(७९) * ३५२३४ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३७४ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी कर वेळेत भरुनही त्यांची आयकराची कपात रक्कम वेळेत जमा न झाल्यामुळे २७००० शिक्षक व कर्मचारी यांना आलेल्या आयकर विभागाच्या नोटीसांबाबत सदर रक्कम जमा करण्याचे आश्वासन मा.शिक्षणमंत्र्यांनी पावसाळी अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण निरीक्षक कार्यालयाच्या नियमबाह्य कारभाराचा मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांना नाहक त्रास झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित शिक्षक व कर्मचारी यांची आयकर कपात रक्कम जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) ज्या शिक्षकांना नोटीसा प्राप्त झाल्या आहेत, अशा शिक्षकांना अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, मुंबई या कार्यालयामार्फत त्यांची आयकर कपात झालेल्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणक क्रमांक व देयक पारित झाल्याचा दिनांक इ. तपशील देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) शहरातील गंगासागर तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी निधी मिळण्याबाबत

**(८०) * ३४८४२ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) शहरातील गंगासागर तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेतून निधी मिळण्यासाठी शासनास प्रस्ताव पाठविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी नाशिक जिल्हा प्रशासनाकडे दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने गंगासागर तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेतून निधी मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य सरोवर संवर्धन योजनेतून निधी मिळण्याबाबत कार्यवाही करून, प्रस्ताव शासनास न पाठविण्यासंदर्भात संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) होय. मा.छगनराव भुजबळ यांनी दिनांक ०७ जुलै, २०१७ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी, येवला नगरपरिषदेस गंगासागर तलावाला पर्यावरण संवर्धनासाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याबाबत कळविले होते.

(२) व (३) मुख्याधिकारी, येवला यांच्या अहवालानुसार गंगासागर तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत प्रस्ताव मंजुरीसाठी नगरपरिषद सभेच्या ठरावाची आवश्यकता असून माहे डिसेंबर, २०१७ मध्ये होणाऱ्या नगरपरिषद सर्वसाधारण सभेवर सदर विषयांस मंजुरी घेण्यात येईल. तसेच ठराव पारित झाल्यावर सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास मंजुरीसाठी व निधी मिळण्यासाठी सादर करण्यात येईल. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर शासन स्तरावरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (नागपूर) येथील निवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत

**(८१) * ३५११३ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (नागपूर) येथील निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना शासनाकडून मंजूर झालेले निवृत्तीवेतन न देता निम्मे निवृत्तीवेतन दिले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निवृत्त कर्मचाऱ्यांनी तसेच त्यांच्या संघटनेने मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी व दिनांक २४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) नाही.

मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक २३/३/२०१७ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतनाचे दायित्व राज्य शासनाने स्वीकारले आहे. तथापि, अद्यापपर्यंत आर्थिक तरतूद उपलब्ध न झाल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास स्वउत्पन्नातून वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन अदायगी करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना प्राधिकरणाने अनुज्ञेय ठरविलेले निवृत्तीवेतन प्राधिकरणामार्फत नियमितपणे अदा केले जात आहे.

तथापि, माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे एकाच वेळेस पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने उपलब्ध निधीतून प्रथमत: ६०% निवृत्तीवेतन दिनांक ६/९/२०१७ रोजी व उर्वरित ४० % निवृत्तीवेतन दिनांक १४/९/२०१७ रोजी निवृत्तीवेतनधारकास अदा करण्यात आलेले आहे.

(२) बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सेवानिवृत्त कर्मचारी कल्याण संस्था, नागपूर यांचे दिनांक ११/९/२०१७ चे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) दिनांक २३/३/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन, निवृत्तीवेतन व भत्ते राज्य शासनामार्फत अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतनाच्या अदायगीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी डिसेंबर, २०१७ च्या विधीमंडळ अधिवेशनामध्ये पुरवणी मागणी प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात नियमबाहय सुरु करण्यात आलेल्या बालवाडया, पाळणाघर, नर्सरी, प्लेग्रुप यांच्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(८२) * ३५२७५ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात ठिकठिकाणी नियमबाहय बालवाडया, पाळणाघर, नर्सरी, प्लेग्रुप सुरु होऊन यामध्ये बालकांची सुरक्षितता धोक्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार पुणे शहरात नियमबाहय सुरु करण्यात आलेल्या बालवाडया, पाळणाघर, नर्सरी, प्लेग्रुप यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) या संदर्भातील धोरण शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी संस्थामधील उपकरणे, साहित्य व संगणक कालबाह्य झाल्याबाबत

**(८३) * ३५३९३ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३२१८१ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तंत्रशिक्षण विभागामार्फत तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी संस्था चालविल्या जात असून तंत्रशिक्षण विभागात विविध अधिकाऱ्यांची ६१५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर संस्थेत मागील २० वर्षापुर्वीची तांत्रिक उपकरणे व संगणके कालबाहय झाली असून या कालबाहय झालेल्या उपकरणावर विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात असल्याने विद्यार्थी व अध्यापकांना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर उपकरणे बदलून अद्यावत उपकरणे घेण्यासाठी तसेच रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दिनांक ०८/८/२०१७ च्या शासन ज्ञापनाव्दारे चालू आर्थिक वर्षात रुपये २५६२.८३ लक्ष इतक्या रकमेच्या विविध उपकरणे/यंत्रसामग्री खरेदीसाठी शासनस्तरावरून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांच्यास्तरावर खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व आस्थापना, पदवी व पदविका संस्थांमधील गट अ व गट ब च्या पदांची सुधारित बिंदुनामावली प्रमाणित करुन घेण्याची व आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. तद्नंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगास रिक्त पदांच्या अनुषंगाने

मागणीपत्रे सादर करण्यात येतील. ज्या पदांकरीता आयोगाकडून शिफारशी प्राप्त झाल्या आहेत, त्या पदांवरील नियुक्ती देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी शाळेतील शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी देण्याबाबत

**(८४) * ३५७७५० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना १२ वर्षे सेवा पूर्ण झाल्यांनतर वरिष्ठ वेतनश्रेणी व २४ वर्षे पूर्ण झाल्यानंतर निवडश्रेणी दिली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अशासकीय अनुदान प्राप्त प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकांना विना अट वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी देय ठरविण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री महोदयांना माहे सप्टेंबर, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम १९८१ व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) पहिली सुधारणा नियम २०१६ मधील अनुसूचि (क) प्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी देय ठरते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना ही वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी मंजूर होण्यासाठी शाळा व्यवस्थापनाचा ठराव बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनेक खाजगी व्यवस्थापनाच्या शिक्षण संस्थांकडून अशा पात्र शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी मंजूर करण्यासाठी विरोध केला जात असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांना देय असलेल्या वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणीचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र क्षेत्रिय कार्यालयास सादर केल्यानंतर त्यांना देय असलेले लाभ मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.
(५) खाजगी व्यवस्थापनाच्या शिक्षक संस्थांकडून पात्र शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी मंजूर करण्यास विरोध केला जात असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुर्व प्राथमिक शिक्षणाचा धोरणाचा कायदा तयार करण्याबाबत

**(८५) * ३५२०४ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ३१४७९ ला दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पुर्व प्राथमिक इंग्रजी व मराठी विद्‌यालयांमधील शिक्षणाबाबत विहीत अटी शर्ती आणि शैक्षणिक व भौतिक सुविधेसंदर्भात कायदेशिर नियंत्रणासाठीचे धोरण निश्चिती व कायदा तयार करण्याच्या विचाराधीन बाबीवर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात विनापरवाना व बेकायेदशिररित्या इंग्रजी माध्यमाच्या खाजगी नर्सरी/शाळांचे प्रमाण वाढले असून या शाळांकडे दर्जेदार शिक्षणाच्या कोणत्याही शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध नसतांना शुल्क आकारणी करुन त्यांच्याकडून नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात इंग्रजी माध्यमाच्या खाजगी नर्सरी/शाळांची संख्या वाढली असून शैक्षणिक व भौतिक सुविधा आणि प्रशिक्षित तसेच विहित शैक्षणिक अहर्ता असलेले शिक्षक यांची कमतरता असतानाही नर्सरी व शाळांचे संचालन केले जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शैक्षणिक व भौतिक सुविधांनी ग्रासलेल्या खाजगी नर्सरी शाळांविरुध्द कोणतीही कारवाई होत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व पालकांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पुर्व प्राथमिक शिक्षणाचे नियंत्रण करण्यासाठी धोरण व अधिनियम तयार करण्याबाबतची कार्यवाही केंव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. शासनाच्या विचाराधीन आहे.
(२), (३) व (४) नाही.
(५) अधिनियमाच्या प्रारुपाची छाननी शासनस्तरावर चालू आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आणण्याबाबत

**(८६) * ३५९२५ आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २८४२६ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आणण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्लास्टिक पिशव्यांना पर्याय म्हणून पर्यावरणपुरक पिशव्यांच्या निर्मिती करणाऱ्या अनेक संस्थाकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू अनेक संस्थाकडून प्राप्त प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयातील शिक्षक अतिरिक्त झाल्याबाबत

**(८७) * ३४७०४ श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील ५ किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या १९१ शाळा आगामी शैक्षणिक वर्षापासून बंद करण्यात येणार असल्यामुळे ३५३ शिक्षक अतिरिक्त ठरणार असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शाळातील विद्‌यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) येथील सुजलाम केमिकल्स कंपनीतून मेफेड्रॉन जप्त केल्याबाबत

**(८८) * ३६२२८ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) येथील अन्न व औषध प्रशासनाचा परवाना असलेल्या सुजलाम केमिकल्स कंपनीत मेफेड्रॉन या अंमली पदार्थाचे उत्पादन होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुजलाम केमिकल्स कंपनीतून पोलीस विभागाच्या विरोधक पथकाने दिनांक १४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास जप्त केलेले १ किलो ५०० ग्रॅम मेफेड्रॉनचे उत्पादन कंपनीतच होत असल्याचे पोलीस तपासात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुजलाम केमिकल्स कंपनीमध्ये मागील १५ वर्षात फक्त ५ तपासण्या करण्यात आल्या तसेच मागील १५ वर्षात सदर कंपनीने उत्पादीत केलेल्या एकाही पदार्थाचा नमुना अन्न व औषध प्रशासनाने विश्लेषणास्तव घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुजलाम केमिकल्स या कंपनीत अंमली पदार्थाचे उत्पादन होत असतांना त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कार्यवाही करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी पत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) व (२) पोलिसांकडील अहवालांवरुन सुजलाम केमिकल्स कंपनीत मेफेड्रॉन या अंमली पदार्थाचे उत्पादन होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) व (५) मा.लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांचेकडून अहवाल मागविण्यात आला असून सदर अहवाल प्राप्त होताच नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयातील माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना वेतन देण्याबाबत

**(८९) * ३५९९७ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील ७०० माध्यमिक शाळांमधील शिक्षकांचे मागील ९ महिन्यांपासून वेतन थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मागील ९ महिन्यांपासून वेतन न झालेल्या शिक्षकांवर उपासमारी, कर्ज हप्ते, विमा हप्ते थकीत राहणे, कर्जबाजारीपणा आणि दैनिक वेळापत्रकातील गोंधळ यामुळे असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांचे थकित वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

सातारा जिल्हयातील माध्यमिक शिक्षण विभागामधील एकूण ६२७ शाळांमध्ये १०११० शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी ३८२ कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत झाले आहे. परंतू सदर कर्मचाऱ्यांचे सद्य:स्थितीत नियमित वेतन सुरु आहे.

(२) संस्थेने बदली मान्यता प्रस्ताव विलंबाने सादर केल्यामुळे, अतिरिक्त कर्मचाऱ्यांना मुख्याध्यापकांनी रुजू करुन न घेतल्याने, मुख्याध्यापक पदोन्नती मान्यता प्रस्ताव संस्थेने विलंबाने सादर केल्यामुळे, कर्मचाऱ्यांच्या रजा उशीरा मंजूर झाल्याने, न्यायालयीन प्रकरण, इ. कारणामुळे वेतन थकीत राहीलेले आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

थकीत वेतन झालेल्या ३८२ कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन सुरु असल्यामुळे शिक्षकांवर उपासमारी, कर्ज हप्ते, विमा हप्ते थकीत राहणे, कर्जबाजारीपणा, अशी परिस्थिती नाही. ३८२ शिक्षकांचे थकीत वेतन अदा करण्याची कार्यवाही शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद सातारा यांचे स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाने परिक्षा शुल्कात वाढ केल्याबाबत

**(९०) * ३५८२० श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रविंद्र फाटक, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड : तारांकित प्रश्न क्रमांक ३२६०९ ला दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परिक्षा व फेरपरिक्षांच्या शुल्कात या सत्रापासून दुप्पटीपेक्षा वाढ करण्यात आली असून पदवी आणि पदव्युत्तर परिक्षा शुल्क ६५० रुपयांवरुन १५६० रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाने शुल्क वाढीबाबतचे परिपत्रक महाविद्यालयांना उशिरा पाठविल्यामुळे महाविद्यालयाचे निकाल, प्रवेश प्रक्रिया आणि वाढीव शुल्क यासर्व गोष्टी एकदम आल्याने नोकरी करुन शिकत असलेल्या, हॉस्टेलवर राहत असलेल्या गरीब विद्यार्थ्यांना ही अतिरिक्त शुल्कवाढ परवडत नसल्याने विद्यार्थ्यांनी त्याविरोधात माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन करण्याचा इशारा दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोंधळात पार पडलेल्या परिक्षा, उशीरा लागलेले निकाल आणि अचानक वाढलेले शुल्क यामुळे विद्यार्थ्यांना तसेच त्यांच्या पालकांना आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई विदयापीठाने परिक्षा शुल्कात केलेली वाढ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विदयार्थ्यांसह सर्वच विदयार्थ्यांना सोयीची नसल्यामुळे त्याचा फेरविचार करुन सदरची शुल्क वाढ कमी करावी अशी विदयार्थी व पालकांनी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुप्पटीने वाढविण्यात आलेली शुल्क वाढ रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) विद्यार्थी संघटना व पालक वर्गातुन फी वाढ कमी करण्याबाबत विद्यापीठास निवेदन देण्यात आले होते त्याअनुषंगाने विद्यापीठाने दिनांक २५/१०/२०१७ रोजी झालेल्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन परीक्षा शुल्कात खालीलप्रमाणे कपात सुचविली आहे.

| No Of Subject/s | Fee Amount in Rupees | |
|---|---|---|
| | U.G | P.G |
| One | २०० | ४०० |
| Two | ४०० | ७०० |
| Three and above | १००० | १५०० |

त्यामध्ये विद्यार्थ्यांवर अतिरिक्त शुल्काचा बोजा पडू नये म्हणून विषयांवर शुल्क आकारण्याचे ठरविले आहे. तसेच पद्व्युत्तर परीक्षांनाही विषयांवर शुल्क लागू करण्याचा प्रस्ताव अधिष्ठाता मंडळाने मंजूर केलेला आहे.

सदर शुल्क कपातीचा प्रस्ताव ११/१२/२०१७ रोजी होणाऱ्या विव्दत परिषदेमध्ये ठेवण्यात येणार असून तो विव्दत परिषदेमध्ये मान्य झाल्या नंतर विद्यार्थ्यांसाठी लागू करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठ पदव्युत्तर महाविद्यालयात अनधिकृत अभ्यासक्रम राबविल्याबाबत

**(९१) * ३५६५४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठात पदव्युत्तरचे चार पार्ट टाईम अभ्यासक्रम २२ महाविद्यालयांमध्ये अनधिकृतपणे सुरु असल्याचे निदर्शनास आले असून या पदव्यांचे अभ्यासक्रम चालविण्यासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता घेतली नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमाबाबत युजीसीच्या नियमावलीनुसार अधिसूचनेत नमूद करण्यात आलेले अभ्यासक्रम राबविणे बंधनकारक असतानाही सदर चार अभ्यासक्रमांचा समावेश २२ महाविद्यालयांमध्ये करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान थांबविण्यासाठी महाविद्यालयांमध्ये समाविष्ट करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांवर नियंत्रण ठेवण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) ते (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील गुटखा तस्करीची चौकशी करण्याबाबत

**(९२) * ३५०६२ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात पोलीस व अन्न औषधी प्रशासनाची नजर चुकवून थेट गॅरेज टू गॅरेज गुटखा तस्करी केली जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त गुटखा तस्करी पोलीस व अन्न औषध प्रशासन विभाग यांच्या संगनमताने मध्य प्रदेशामधून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गुटखा तस्करी रोखण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) गॅरेज टू गॅरेज गुटखा तस्करी होत असल्याची बाब अन्न व औषध प्रशासनामार्फत करण्यात आलेल्या तपासणीत निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई येथे खाजगी अनुदानित शाळा अनधिकृतपणे सुरु असल्याबाबत

**(९३) * ३६७९० श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ३२६५५ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई येथील खाजगी अनुदानित शाळेने खोटी व बनावट कागदपत्रे तयार करुन ती खरी असल्याचे भासवून नमुना-दोन नुतनीकरणाचा प्रस्ताव सादर करुन शासनाची फसवणूक केल्याचे तसेच शालेय पोषण आहारासाठी जास्त विद्यार्थी संख्या दाखवून त्याव्दारे अन्नधान्य व इतर वस्तु मागवून त्याचा अपहार करणाऱ्या शिक्षकांविरुध्द अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे वसई तालुक्यातील सेंट जोसेफ मराठी शाळेच्या व्यवस्थापकांनी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या निवेदनाच्या परिच्छदे क्र. ३ ते परिच्छदे क्र. ५ व्दारे निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, खूप कमी विद्यार्थी संख्या असतानाही वसई तालुक्यातील खाजगी अनुदानित शाळेचे शिक्षक व शिक्षण विभागातील अधिकारी यांनी संगनमत करुन मागील ६ वर्षात बोगस हजेरीपटाव्दारे शासनाची एक कोटी रुपयाहून जास्त रक्कमेची फसवणूक केल्याचे दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या निदर्शनास निवेदनाव्दारे आणल्यानंतर त्याबाबतची चौकशी करण्याचे काम या गैरव्यवहारात सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आल्याचे संबंधित शाळेच्या व्यवस्थापकांनी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी निवेदन देऊन त्यांच्या निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद पालघर व पंचायत समिती वसई येथील भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे अत्यंत कमी पटसंख्या असलेल्या खाजगी अनुदानित शाळा सुरु असून शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान होत असल्याचेही वसई तालुक्यातील संबंधित शाळेच्या व्यवस्थापकांनी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्या दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनादवारे निदर्शनास आणले असल्याने याप्रकरणी चौकशी करुन संबंधिताविरुध्द गुन्हा (एफ.आय.आर.) नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द गुन्हा नोंदविला नसल्यास त्याबाबत जबाबदार असलेले अधिकारी व संबंधित शिक्षक यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) सदर शाळेसंदर्भात दिनांक २९/९/२०१७ व ७/१०/२०१७ ची निवेदने प्राप्त झाली आहेत.
(३) व (४) शाळेसंदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनास अनुसरून चौकशी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाबाबत

**(९४) * ३५७०५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ३११८७ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण विभागाने दोन वर्षापूर्वी शाळाबाहय मुले शोधून त्यांना पुन्हा शाळेत दाखल केले असा शासनाचा दावा असला तरी या मुलांच्या सध्याच्या शैक्षणिक स्थितीबद्दल शिक्षण विभागाकडे कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळाबाहय मुलांच्या सर्वेक्षणानंतर जाहिर करण्यात आलेली आकडेवारी संदिग्ध स्वरुपाची असून शाळाबाहय मुले शाळेत येतात की नाही याबाबत शिक्षण विभागाकडे कोणतीच माहिती उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळाबाहय मुलांच्या शिक्षणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.

(३) सन २०१५-१६ च्या सर्व टप्प्यातील सर्वेक्षणानुसार ७४,९७१ एवढी शाळाबाहय मुले आढळून आली होती. यापैकी ५०,००४ इतक्या मुलांना नजिकच्या नियमित शाळेत दाखल करण्यात आले आहे. उर्वरित शाळा बाहय मुले शाळेत दाखल झाली आहेत किंवा कसे याबाबत सर्व जिल्हे व महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळाबाहय मुलांसंदर्भात, स्थलांतरण रोखण्यासाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत निवासी हंगामी वसतिगृह योजनेंतर्गत भोजन व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे. काही मुले स्थलांतरीत झाल्यास त्यांच्यासाठी शिक्षण हमी पत्र उपलब्ध करुन देण्यात येत आहे. अशा मुलांची माहिती संगणक प्रणालीव्दारे संबंधित जिल्हयांना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु असून, शासन परिपत्रक दिनांक ३ नोव्हेंबर, २०१६ अन्वये राज्यांतर्गत स्थलांतरीत होणाऱ्या मुलांच्या हजेरीसाठी ॲपवर आधारित व्यवस्था सरल प्रणालीमध्ये करण्यात येणार आहे. जलद प्रगत शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत शाळाबाहय बालकांसंदर्भात झपाटयाने काम करणाऱ्या शिक्षकांची बालरक्षक म्हणून नोंदणी विद्या परिषदेच्या वेब पोर्टलवर करण्यात आलेली आहे. राज्यभरातील शाळाबाहय मुलांच्या समन्वय व नियोजनासाठी महाराष्ट्र विद्या प्राधिकरणामध्ये समता कक्षाची निर्मिती करण्यात आली असून, हा कक्ष शाळाबाहय मुलांचे शिक्षण, हंगामी मुलांचे स्थलांतरण रोखणे, बालरक्षक चळवळ सक्षमीकरण याअनुषंगाने कार्यरत राहणार आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार राज्यातील ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी शासन कटीबध्द आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.